जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रद्धास्थळे बनली चोरट्यांचे लक्ष्य; सोन्या-चांदीचे दागिने, दानपेट्या चोरीच्या घटनांत मोठी वाढ

नगर – सोन्या–चांदीच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने चोरट्यांनी थेट मंदिरांवर आपले लक्ष केंद्रित केल्याचे चित्र समोर येत आहे. अलीकडच्या काळात एकामागून एक मंदिरांमध्ये दागिन्यांची चोरी होत असल्याने भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. श्रीगोंदे तालुक्यात यापूर्वी दोन मंदिरांमध्ये चोरीच्या घटना घडल्या होत्या. त्या घटनांचा तपास सुरू असतानाच आता खर्डा येथील जैन श्वेतांबर मंदिरात चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या मंदिरातील मौल्यवान दागिने आणि चांदीचे साहित्य चोरट्यांनी लंपास केले आहेत. या घटनेमुळे जैन समाजात तीव्‍ संताप व्यक्त केला जात आहे. चोरट्यांना त्वरित जेरबंद करावे, अशी मागणी समाज बांधवांमधून होत आहे.

याच दरम्यान संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील साईबाबा मंदिरातही चोरी झाल्याची घटना घडली आहे. या मंदिरात मुक्कामाकरिता पायी दिंडी आली होती. या मंदिरात ठेवलेल्या पालखीतील चांदीच्या पादुकांची चोरी झालेली आहे. या अगोदरही जिल्ह्यातील काही मंदिरांतील दान पेट्या चोरीच्या घटना घडलेल्या असून त्याची पोलिस दप्तरी नोंद आहे. त्यातील अनेक चोर्यांचा तपास अद्याप लागलेला नाही. त्यातच आता नव्याने चोरीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे भाविकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### जैन मंदिरातून सोन्या-चांदीचे दागिने लांबविले

जामखेड तालुक्यातील खर्डा येथील जैन श्वेतांबर मंदिरातून सोने–चांदीचे दागिने चोरीची घटना ३० जानेवारी रोजी पहाटे घडली आहे. या प्रकरणी खर्डा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याबाबत कांतिलाल मोतीलाल खिंवसरा (वय ६०, रा. खर्डा) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, खर्डा येथील जैन श्वेतांबर मंदिराचा लाकडी दरवाजा तोडून चोरट्याने मंदिरात प्रवेश केला. त्यानंतर त्याने मंदिरातील मूर्तीवरील सोन्या–चांदीचे दागिने चोरून नेले. एकूण ८० हजाराचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला आहे. या प्रकरणी खर्डा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक राजपूत करीत आहेत.

### ग्रामीण भागातील मंदिरे चोरट्यांकडून लक्ष्य

जिल्ह्यात अवघ्या काही दिवसांत घडलेल्या या घटनांमुळे मंदिरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अनेक मंदिरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसणे, रात्री सुरक्षारक्षकांची व्यवस्था नसणे, तसेच परिसरात अपुरी पोलीस गस्त याचा फायदा चोरट्यांना होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः ग्रामीण भागातील मंदिरे ही चोरट्यांचे मुख्य लक्ष्य ठरत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात मंदिरांमध्ये चोरीच्या घटना वाढत आहे. त्यामुळे मंदिरांना पुरेशी सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी पोलिसांवर येऊन ठेपली आहे. जिल्ह्यातील सर्व प्रमुख आणि ग्रामीण मंदिरांची सुरक्षा व्यवस्था तपासून आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवावा, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भारत-युरोपियन युनियन करार

### मथळ्यांच्या पलीकडे पाहताना पाहण्याचा दृष्टिकोन



राजन कुटे

हा करार बाजाराला तात्काळ चालना देणारा घटक म्हणून न पाहता, दीर्घकालीन आर्थिक परिणामांच्या चौकटीत पाहणे अधिक योग्य ठरेल – विशेषतः उत्पादन क्षमता, निर्यात स्थैर्य, भांडवली प्रवाह आणि रोजगाराची गुणवत्ता या अंगांनी.

अलीकडच्या काळात भारत–युरोपियन युनियन कराराबाबतच्या बातम्या हळूहळू पुढे येत आहेत. अनेकांसाठी हा केवळ आणखी एक व्यापारविषयक मथळा वाटू शकतो. मात्र अशा करारांचा खरा परिणाम एका रात्रीत दिसत नाही. तो वेळोवेळी उलगडत जातो आणि अनेकदा बाजाराच्या दैनंदिन हालचालींपेक्षा अर्थव्यवस्थेची दिशा अधिक बदलते.

युरोपियन युनियन ही उच्च दर्जाच्या, कडक नियम असलेल्या बाजारपेठेचे प्रतिनिधित्व करते. भारतासाठी येथे प्रवेश मिळणे म्हणजे केवळ निर्यात वाढवणे नव्हे, तर मानकांची उंची वाढवणे होय. युरोपियन निकष पाळण्यासाठी भारतीय उद्योगांना प्रक्रिया, गुणवत्ता आणि सातत्य यावर अधिक लक्ष द्यावे लागेल. दीर्घकाळात याचा फायदा संपूर्ण उत्पादन व्यवस्थेला होतो.

दुसरा महत्त्वाचा परिणाम म्हणजे निर्यात स्थैर्य. दीर्घकालीन करार व्यवसायांना भविष्यासाठी नियोजन करण्याची स्पष्टता देतात – उत्पादन क्षमता, लॉजिस्टिक्स आणि गुंतवणूक याबाबत. ही स्पष्टता अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची असते.

तिसरा स्तर म्हणजे भांडवली प्रवाह. स्थिर व्यापार संबंध दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी विश्वासाचा संकेत ठरतात. पेन्शन फंड्स, सार्वभौम निधी आणि संस्थात्मक गुंतवणूक ही अशा ठिकाणी येते जिथे धोरणात्मक स्पष्टता असते. हे प्रवाह शांतपणे पण सातत्याने अर्थव्यवस्थेला बळकटी देतात.

रोजगारनिर्मितीचा परिणाम हळू दिसतो, पण खोलवर असतो. उत्पादनासोबतच पुरवठा साखळी, लॉजिस्टिक्स, गुणवत्ता नियंत्रण, डिझाइन आणि सेवा क्षेत्रातही संधी निर्माण होतात. हे रोजगार तुलनेने अधिक टिकाऊ असतात.

बाजाराच्या दृष्टीने पाहता, तात्काळ लाभ अपेक्षित ठेवणे ही चूक ठरू शकते. अशा करारांचा फायदा संयमी, शिस्तबद्ध आणि दीर्घकालीन दृष्टी असलेल्या उद्योगांनाच होतो.

म्हणूनच भारत–युरोपियन युनियन करार हा वेगाबद्दल नाही, तर सुसंगततेबद्दल आहे – जागतिक मानकांशी, दीर्घकालीन भांडवलाशी आणि शाश्वत वाढीशी सुसंगततेबद्दल.

शांत प्रगती अनेकदा गोंगाटापेक्षा अधिक महत्त्वाची असते. शांत ठेवा स्पष्ट ठेवा.

**राजन कुटे, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक**
**मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०**

## ‘२२३ राहुरी विधानसभा’ मतदार यादीवरील हरकतींची ३ व ४ फेब्रुवारीला सुनावणी

नगर – २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर एकूण ४ हजार ६०२ हरकती व १ हजार ६९२ दावे प्राप्त झाले आहेत. या प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने आक्षेपित मतदारांच्या समक्ष सुनावणी ३ व ४ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर, राहुरी व पाथर्डी तहसील कार्यालय येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार ६ जानेवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ६ ते २४ जानेवारी या कालावधीत दावे व हरकती मागविण्यात आल्या होत्या. या मुदतीत नमुना अर्ज क्रमांक ६ व ८ मिळून एकूण १ हजार ६९२ दावे तसेच ४ हजार ६०२ हरकती प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. या प्राप्त हरकतींवर निर्णय घेण्यासाठी ३ व ४ फेब्रुवारी रोजी सुनावणी ठेण्यात आली आहे. तरी सदर हरकत अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांनी आवश्यक त्या पुराव्यासह सुनावणीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गावातील देहव्यापार व अवैध धंदे तात्काळ बंद करा; ग्रामसभेत युवकांची मागणी, प्रशासनाचे वेधले लक्ष



ग्रामसभेत आक्रमक होऊन आपली भूमिका मांडताना युवक संदिप बोठे. (छाया – अमित मन्यार)

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथील ग्रामसभेत वेश्या व्यवसाय व कला केंद्र बंद करण्याची एकमुखाने मागणी सर्व ग्रामस्थांनी केली. गावात अनेक दिवसांपासून सामाजिक विघातक व्यवसाय चालू असल्याने ग्रामस्थांनी त्याकडे विशेष लक्ष वेधले. ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यापासून कधीही इतकी मोठी ग्रामसभा झाली नाही इतकी मोठी ग्रामसभा संपूर्ण गावाने पाहिली.

गावातील अवैध तसेच देहव्यापार व्यवसायामुळे गावचे नाव संपूर्ण राज्यात नव्हे देशात झळकल आता तर जगात झळक्याचे बाकी आहे ही निश्चितच अपमानाची व शरमेची गोष्ट आहे. आपल्या गावातील तरुण भविष्यात देशोधडीला लागतील हे थांबल कुठतरी पाहिजे. रुईछत्तीसी गाव हे पंचक्रोशीत सुसंस्कृत गाव म्हणून ओळखलं जातं या गावची परंपरा सुसंस्कृतपणा गावानेच जपला पाहिजे. असे भावनिक उद्गार ग्रामसभेसाठी जमलेल्या तरुणांनी एक सुरत काढला.

जवळपास २ हजार ग्रामस्थांची ग्रामसभेसाठी उपस्थिती होती. नगर तालुका पोलिस स्टेशनचे कर्मचारी या ग्रामसभेसाठी उपस्थित होते. गावातील असे व्यवसाय बंद व्हावेत. सामाजिकदृष्ट्या या गोष्टी दिशादर्शक नाहीत अशी भावना काही महिलांनी देखील व्यक्त केली. गावातील सामाजिक विघातक व्यवसाय बंद झाले नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गावातील विघातक व्यवसाय बंद झाले नाहीतर तालुका व जिल्हा प्रशासन यास जबाबदार राहील असा इशारा देखील ग्रामस्थांनी दिला. एकंदरीत रुईछत्तीशी गावची ग्राम सभा तालुक्यात व जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली.

## तरुणाची गळफास घेत आत्महत्या



सोमेश आदमाने

नगर – राहत्या घरात गळफास घेत तरुणाने आत्महत्या केल्याची घटना शहरातील पॉवर हाऊस जवळील जुने सिव्हील हॉस्पिटल परिसरात ३० जानेवारी रोजी घडली. सोमेश गणपत आदमाने (वय २८) असे मयत तरुणाचे नाव आहे. सोमेश याने घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच नातेवाईकांनी त्याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापुर्वीच मृत घोषित केले. याबाबतचा अहवाल तोफखाना पोलिसांना पाठविण्यात आला. त्यावरुन पोलिसानी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे. मयत सोमेश याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, २ मुले, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## अनिल बोरुडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – मर्चंट बँकेचे कर्मचारी अनिल जगन्नाथ बोरुडे (वय ५१) यांचे ३१ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ असा परिवार आहे.

## रसिकलाल चोपडा यांचे हृदयविकाराने निधन



नगर – महाजन गल्लीतील गायत्री प्रसाद अपार्टमेंट येथील रहिवासी मे. नवलमल कनकमल या फर्मचे संचालक रसिकलाल नवलमल चोपडा (वय ७६) यांचे ३१ जानेवारी रोजी राहत्या घरी झोपेतच हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक विवाहित मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. खिस्त गल्ली येथील स्वस्तिक साडी सेंटरचे संचालक दिनेश चोपडा, स्वीटी डुंगरवाल यांचे ते वडील तर पारस, राजेश, किशोर यांचे काका होत. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. ते अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. आचार्यश्रींवर त्यांची नितांत श्रद्धा होती.

## पारुबाई वाघस्कर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील द्वारकाधीश कॉलनीतील रहिवासी श्रीमती पारुबाई तुकाराम वाघस्कर (वय ९२) यांचे ३० जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दिलीप वाघस्कर यांच्या त्या आई तसेच गणेश, महेश, पप्पू वाघस्कर यांच्या आजी होत.

## लिलाबाई जवक यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गुंडेगाव येथील रहिवासी श्रीमती लिलाबाई दिनकर जवक (वय ७८) यांचे ३० जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अनिल दिनकर जवक यांच्या त्या मातोश्री होत.

## अज्ञात वाहनाची धडक; दुचाकीस्वाराचा मृत्यू


### नगर – सोलापूर महामार्गावरील घटना, वाहन चालक पसार

नगर – नगर सोलापूर महामार्गावर नगर तालुक्यातील वाटेफळ शिवारात असणाऱ्या विश्वशांती हॉटेलजवळ एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दत्तात्रय कोंडीबा गाडे (वय ५३, रा.खुंटेफळ, ता. आष्टी)यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गणेश दत्तात्रय गाडे (वय २१) याने ३० जानेवारीला फिर्याद दिली आहे. फिर्यादी गणेश आणि त्यांचे वडील दत्तात्रय गाडे हे २४ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ च्या सुमारास आपल्या दुचाकीवरून (क्र. एमएच १६ डीयु ५३४४) जात असताना ही घटना घडली. अज्ञात वाहनावरील चालकाने आपले वाहन भरधाव वेगात आणि हयगईने चालवून फिर्यादीच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत फिर्यादीला गंभीर दुखापत झाली, तर त्यांचे वडील दत्तात्रय गाडे यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर अज्ञात चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला आहे. फिर्यादीने दिलेल्या दवाखाना जबाबावरून पोलिसांनी वाहनचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

## नगरमध्ये नायब तहसीलदाराची रेल्वे खाली उडी घेत आत्महत्या



किरण देवतरसे

नगर – नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षात कार्यरत असलेले नायब तहसीलदार किरण रामदास देवतरसे (वय ५७, रा.भिंगार) यांनी रेल्वे गाडीखाली उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३१ जानेवारीला सकाळी ८.३० च्या सुमारास घडली.

सदरची घटना एम आयडीसी ते निंबळक जाणाऱ्या रोडवर असलेल्या रेल्वे गेट जवळ घडली आहे. सकाळी ८.३० च्या सुमारास अमरावती ते पुणे जाणाऱ्या रेल्वे गाडीखाली एकाने उडी घेऊन आत्महत्या केल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी एमआयडीसी पोलिसांना माहिती कळविली. ही माहिती मिळताच सपोनि माणिक चौधरी यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मयताची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता ते नायब तहसीलदार किरण देवतरसे हे असल्याचे समोर आले. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. नायब तहसिलदार देवतरसे यांनी आत्महत्या का केली? याचे कारण समजू शकले नाही.

या घटनेने महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# पोलीस अधिकारी असल्याचे भासवत मागितली पाच लाख रुपयांची खंडणी

### व्यावसायिकाची तक्रार, सायबर पोलिस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – पोलीस अधिकारी असल्याचे भासवून एका व्यावसायिकाला खोट्या गुन्ह्याची भीती दाखवत ५ लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या अज्ञात भामट्यांविरुद्ध नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विनीत नानासाहेब जाधव (वय ३८, रा. सुखकर्ता कॉलनी, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विनीत जाधव यांना २९ जुलै २०२५ ते ३० जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत दोन वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून वारंवार फोन येत होते. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवले आणि जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. हा खोटा गुन्हा टाळण्यासाठी संशयित आरोपींनी त्यांच्याकडे ५ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. सततच्या धमक्यांमुळे घाबरलेल्या जाधव यांनी अखेर ३० जानेवारीला सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दिली.

या तक्रारीवरून पोलिसांनी अनोळखी मोबाईल क्रमांक धारकांसह त्यांच्या इतर अज्ञात साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०८ (३), २०४, ३५१ (२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) नुसार गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून संशयित आरोपींचा शोध घेत आहेत.

## मारहाण करून सोन्याची चेन लांबवली

### चौघांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – पेट्रोलपंपावर झालेल्या बाचाबाचीचा मनात राग धरून पंपचालकाला चौघांनी माराहण करून त्यांच्या गळ्यातील पाच तोळ्याची सोन्याची चेन बळजबरीने हिसकावून चोरून नेल्याची घटना शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे २९ जानेवारीला दुपारी घडली.

याबाबत रामनाथ नामदेव राजपुरे (वय ६४, रा. बालमटाकळी, ता. शेवगाव) यांनी शेवगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २९ जानेवारी रोजी दुपारी १२.४० च्या सुमारास बालमटाकळीतील राज हॉटेलसमोर उभे असताना तेथे तुषार दिगंबर टोके, नारायण हिंमत शितोळे (दोघेही रा. बालमटाकळी, ता. शवगाव) व दोन अनोळखी इसम सत्तूर सारखे हत्यार घेऊन तेथे आले. तेथे येऊन त्यांनी मागे पेट्रोललपंपावर झालेल्या बाचाबाचीचा राग मनात धरून शिवीगाळ केली. त्यानंतर तुषार टोके याने मारहाण केली. नारायण शितोळे याने पाच तोळ्याची सोन्याची चैन बळजबरीने काढून घेतली. त्यानंतर शिवीगाळ करून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे राजपुरे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक मुटकुळे करीत आहेत.

# वीज तांत्रिक कामगार पतसंस्थेचे चार संचालक ५ वर्षांसाठी अपात्र

### जिल्हा उपनिबंधकांचे आदेश, थकीत कर्जामुळे सहकार विभागाची कारवाई

नगर– अहिल्यानगर येथील वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या कारभारात गंभीर अनियमितता झाल्याचे स्पष्ट होत असून, थकबाकीदार ठरलेल्या चार संचालकांवर सहकार विभागाने कठोर कारवाई केली आहे. सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी पतसंस्थेचे माजी चेअरमन, माजी व्हाइस चेअरमन यांच्यासह चार संचालकांना पुढील पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश दिला आहे.

सदर पतसंस्थेत एकूण १७ संचालक असून, त्यापैकी सहा संचालक थकबाकीत गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी संचालक किशोर काळे व सभासद शरद काकडे यांनी २७ मे २०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

तक्रारीनुसार, सचिन चोरगे, आशिष वेळापुरे व अरविंद पाठक हे संचालक ३१ मार्च २०२५ अखेर थकबाकीदार ठरले होते. सहकारी संस्थेमध्ये कर्जवाटपानंतर वसुली करणे ही संपूर्ण संचालक मंडळाची सामूहिक जबाबदारी असताना, संचालकच थकबाकीत गेल्याने संस्थेच्या आर्थिक शिस्तीवर व हितावर गंभीर परिणाम झाला. सहकारी कायद्यानुसार निवडून आलेला संचालक थकबाकीदार ठरल्यास तो संचालकपदासाठी अपात्र ठरतो.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सविस्तर सुनावणी घेतली. त्यानंतर पतसंस्थेचे माजी चेअरमन सचिन चोरगे, माजी व्हाइस चेअरमन आशिष वेळापुरे, अरविंद पाठक व सचिन सुडके या चार संचालकांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश देण्यात आला आहे. दरम्यान, थकबाकीदार ठरलेल्या संचालकांनी यापूर्वी पारदर्शक कारभाराचा आग्रह धरणारे माजी चेअरमन बाळासाहेब जावळे यांच्याविरोधात कोणताही ठोस पुरावा नसताना बेकायदेशीर अविश्वादस ठराव आणल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणी बाळासाहेब जावळे यांनी विभागीय सहनिबंधक, नाशिक यांच्याकडे दावा दाखल केला असून, तो सध्या प्रलंबित आहे.

तसेच उर्वरित दोन थकबाकीदार संचालकांचे पुरावे सादर करूनही त्यांच्यावर अद्याप अपात्रतेची कारवाई न झाल्याने, या निर्णयाविरोधातही विभागीय सहनिबंधक, नाशिक यांच्याकडे दाद मागण्यात येणार असल्याचे तक्रारदार किशोर काळे व शरद काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई पुढेही सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. तक्रारदारांच्या वतीने ॲड. बबनराव कवडे यांनी कायदेशीर कामकाज पाहिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### वयाच्या चाळीशीनंतर...

चाळीशीच्या वयात आहारात बदल केल्याने तुमच्या दीर्घकालीन आरोग्यावर खोलवर परिणाम होऊ शकतो. वय वाढत असताना, आपले चयापचय मंदावते, हार्मोनल बदल वजन, ऊर्जा आणि मूडवर परिणाम करू शकतात आणि हृदयरोग, मधुमेह आणि ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांचा धोका वाढवतात. या बदलांदरम्यान योग्य अन्न चयापचय वाढवून, स्नायूंचे वस्तुमान राखून, हार्मोन्स संतुलित करून, हाडे मजबूत करून आणि हृदय आणि मेंदूचे आरोग्य सुधारून शरीराला आधार देऊ शकते. चांगल्या आरोग्यासाठी चाळीशीच्या वयात तुम्ही तुमच्या आहारात हे पदार्थ समाविष्ट करावेत. पालेभाज्या कॅल्शियम, मॅग्नेशियम, फोलेट आणि व्हिटॅमिन के ने समृद्ध असतात, जे हाडांची घनता, हृदयाचे आरोग्य आणि संज्ञानात्मक कार्य सुधारण्यास मदत करतात. ४० वर्षांनंतर हाडांची घनता नैसर्गिकरित्या कमी होते, म्हणून नियमितपणे हिरव्या भाज्या खाल्ल्याने हाडे मजबूत होतात आणि फ्रॅक्चर आणि ऑस्टियोपोरोसिसचा धोका कमी होतो.

## पाककला

### कुरकुरीत चपाती चिप्स्

**साहित्य :** उरलेल्या चपात्या, लाल तिखट- १ छोटा चमचा, चाट मसाला- १ छोटा चमचा, मीठ चवीनुसार, तेल, कढीपत्ता ५-६ पाने

**कृती :** सर्वात आधी चपाती कापून घ्या, सर्वप्रथम उरलेल्या चपात्यांचे शंकरपाळ्यासारखे छोटे चौकोनी तुकडे किंवा पिझ्झासारखे त्रिकोणी तुकडे करून घ्या. आता कढईत तेल गरम करा. तेल चांगले तापले की त्यात चपातीचे तुकडे टाकून मध्यम आचेवर तळून घ्या. जर तुम्हाला जास्त तेल नको असेल, तर तुम्ही तव्यावर थोडे तेल टाकून हे तुकडे खरपूस भाजू शकता. चपातीचे तुकडे कुरकुरीत आणि सोनेरी रंगाचे झाले की ते एका कागदावर काढून घ्या. आता एका बाऊलमध्ये तळलेले तुकडे घ्या. त्यावर लाल तिखट, चाट मसाला आणि मीठ टाका. सर्व तुकड्यांना मसाला व्यवस्थित लागेल अशा पद्धतीने बाऊल हलवून मिक्स करा. तसेच तुम्हाला हवे असल्यास थोडे तेल गरम करून त्यात कढीपत्ता आणि चिमूटभर हिंग टाकून ही फोडणी चिप्सवर घालू शकता. हे कुरकुरीत चिप्स तुम्ही हवाबंद डब्यात साठवून ठेवल्यास २-३ दिवस छान राहतात.

## वास्तू

### याने वाढेल पैशांचा प्रवाह

तुळशीच्या झाडाचे मूळ तिजोरीत ठेवल्याने आर्थिक समृद्धी आणि संपत्तीची सतत वाढ होण्यास मदत होते. असे मानले जाते की तुळशीच्या झाडामध्ये दैवी ऊर्जा असते जी पैशाच्या प्रवाहावर सकारात्मक परिणाम करू शकते. तिजोरीत त्याचे मूळ ठेवल्याने ते दैवी ऊर्जा गोळा करून पैशाचा प्रवाह वाढवते. त्यामुळे तुमच्या घराची आर्थिक स्थिती चांगली राहते.

## सौंदर्य

तूपात ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन ए असते, जे त्वचेला आतून हायड्रेट करते. दररोज ते सेवन केल्याने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.

## सल्ला

दही ताजे असेल तर इडलीला चव छान येते. जर तुम्हाला इडली अधिक पौष्टिक हवी असेल, तर पिठात किसलेलं गाजर किंवा बारीक चिरलेली कोथिंबीर घालू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, पुष्य २३।५८, सूर्योदय ०६ वा. ४३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३५ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस कठोर परिश्रम करण्यात जाईल. आजची संध्याकाळ मित्रांबरोबर व्यतित कराल.

**वृषभ :** मानसिक सुखशांती मिळेल. कामाच्या ठिकाणी प्रसन्न वातावरण राहील. कुटुंबाकडून सहयोग मिळेल.

**मिथुन :** प्रवासासाठी दिवस उत्तम आहे व वरिष्ठांशी संपर्क आपल्यासाठी आनंद देणारा ठरेल. मनोरंजनासाठी वायफळ खर्च होईल.

**कर्क :** व्यस्त रहाल. मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. व्यापार-व्यवसायिकांना दिवस संमिश्र. शत्रूंपासून दूर राहा.

**सिंह :** काळ अनुकूल आहे कामे सहज होतील. राजकारणी लोकांचा पाठिंबा मिळेल. मन उल्हासित होईल. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल.

**कन्या :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. काही प्रश्नांची सोडवणूक सर्वांना एकत्र आणून करावी लागेल.

**तूळ :** कामाचा भार अधिक राहील. जोखमीची कामे टाळा. महत्वाचे काम टाळा. कौटुंबिक सभासदांशी वादविवाद टाळा.

**वृश्चिक :** एखाद्याच्या सहयोगाने कार्ये पूर्ण होतील. जोडीदाराबरोबर घालवलेली वेळ सुखद राहील. देवाण-घेवाण टाळा.

**धनु :** आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. इतरांना सहकार्य केल्याने वाद उद्भवू शकतात. आर्थिक उन्नति होईल.


**मकर :** एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते.

**कुंभ :** प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील.

**मीन :** आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. कामांची गती मंदावेल. शांत रहा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७३५७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) मदत करणारा; साहयकर्ता ५) मित्र; सोबती; दोस्त; यार ७) खालचा भाग; बूड ८) टवाळी करणारा ९) महाराष्ट्रातील प्रसिद्ध दिवंगत गुरुजी (आडनाव) १०) गुंतागुंत ११) प्रयत्न; खटाटोप ; प्रयास १४) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १५) पुरुषाचे एक आदरयुक्त नाव १९) नाही म्हणणे २१) सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध; जखमेतून वाहणारा द्रव २२) अंगीकारलेले व्रत २३) साखर वगैरेचा कढविलेला रस; शुद्ध; शिजविलेले अन्न २४) एक मराठी आडनाव; महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री - नारायण ++ २५) गुच्छ; झुबका; समूह २६) अश्व; घोडा

**उभे शब्द :-** १) निवडणुकीत याचे दान करतात २) पर्ण; अर्धा भाग; सैन्य ३) टापटीप; साफसूफ; स्वच्छ ४) एक अधिक पाव ५) फार खोल ; गंभीर ६) मिठाची चव ९) सरपटणारा एक जीव ११) खंदणे; खोदणे १२) कानउघडणी करणे; फाडणे १३) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था (संक्षिप्त नाव) १६) करंजीसारखा एक खाद्यपदार्थर १७) व्यर्थ चक्कर; वायफळ फेरी १८) बसण्यासाठीचे एक छोटे वस्त्र; आसन २०) धरणी; धरती; पृथ्वी; वसुधा

शब्दगंध क्र. ७३५६ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जे काम इतरांना सांगण्यासारखं आहे; ते उद्यावर ढकलू नका!

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'मेयोनेज' कशापासून बनवले जाते?

मोमोजसोबत मेयोनेज खाणे सर्वांना आवडते, तर अंडी-आधारित मेयोनेझ आणि अंडी शिवाय शाकाहारी मेयोनेज कसे बनवले जातात आणि ते आरोग्यासाठी कोणते धोके निर्माण करू शकतात ते जाणून घ्या. मूळ मेयोनेजमध्ये वनस्पती तेल, अंड्याचा पिवळा भाग, व्हिनेगर किंवा लिंबाचा रस, मीठ, मिरपूड आणि कधीकधी चवीनुसार मोहरी पावडर असते.

मिक्सर किंवा ब्लेंडरमध्ये हे घटक एकत्र करून मेयोनेझ तयार केले जाते. तसेच अंडी-विरहीरित मेयोनेझ थंड दूध किंवा क्रीमपासून बनवले जाते. पीठ, मोहरी किंवा व्यावसायिक स्टॅबिलायझर, रिफाइंड तेल किंवा पाम तेलासह जोडले जातात.

दुकानदार बहुतेकदा दोन्ही प्रकारचे मेयोनेज देतात. लहान दुकानांमध्ये किंवा मोमोज विकणाऱ्यांमध्ये अंडी-आधारित मेयोनेज अधिक सामान्य आहे.

### ज्ञानाचा भुकेला

त्या काळात महादेव गोविंद रानडे हे हायकोर्टाचे न्यायाधीश होते. त्यांना भाषा शिकण्याची प्रचंड आवड होती. या छंदामुळे त्यांनी बऱ्याच भाषा शिकल्या; पण त्यांनी अजून बंगाली भाषा शिकली नव्हती. शेवटी त्यांना एक उपाय लक्षात आला. त्यांनी एका बंगाली न्हाव्याकडून दाढी-कटिंग करवण्यास सुरुवात केली. न्हावी जोपर्यंत त्यांची दाढी-कटिंग करायचा ते त्याकडून भाषा शिकायचे.

रानडे यांच्या पत्नीने यावर आपल्या पतीला म्हटले की आपण हायकोर्टाचा न्यायाधीश आहात आणि न्हाव्याकडून भाषा शिकता! जर कुणी पाहिलं तर काय विचार करेल, आपला आदर कसा राहील! बंगाली शिकायचं असेल तर एखाद्या विद्वानाकडून शिका. यावर रानडे यांनी हासत भाष्य केले की मी तर ज्ञानाचा भुकेला आहे, माझा व्यावसायाशी काय संबंध? हे उत्तर ऐकून बायको पुन्हा काहीच बोलली नाही.

तात्पर्य : ज्याला ज्ञानाची भूक असते तो सर्वांचे गुण पाहतो व्यावसाय नाही.

## जीवन का अमृत (भाग १)



### अंतरिक शक्तियाँ

सिमरन, आत्मा को शरीर से सिमटने में मदद करता है। सिमरन में वह बीज है, जो आत्मा के विकास में सहायक होता है। सिमरन से इंसान आत्म-निरीक्षण करने वाला और एकाग्रचित हो जाता है। आंतरिक मंडलों में मन के एकाग्र होने से निश्चित ही असाधारण शक्तियाँ प्राप्त हो जाती हैं । सिमरन हर खतरे से बचने का हथियार है। यह सभी रूहानी मंडलों मे प्रवेश के लिए पहचान शब्द है। यह मुसीबत और के समय शरीर तथा मन को ताकत देता है और आत्मा को सत्गुरु के पास ले जाता है। रूहानियत एक आंतरिक अनुभव है और इसकी क,ख,ग वहाँ से शुरू होती है; जहाँ सभी दर्शन और योगाभ्यास खत्म हो जाते हैं। यह आत्मा का अनुभव है। इसका पहला व्यावहारिक पाठ तब आरम्भ होता है, जब सच्चे सत्गुरु की कृपा से साधक पूर्ण रूप से शरीर से ऊपर उठ जाता है। कोई भी बिना किसी सहायता के भौतिक शरीर से ऊपर नहीं उठ सकता है, इससे अलग नहीं हो सकता है सत्गुरु सच्चे चाहने वालों को रूहानियत की दात बाँटने के लिए आते हैं। इसे खरीदा नहीं जा सकता है। इसे पढ़ाया भी नहीं जा सकता है। रूहानियत तो रूहानी लोगों के संपर्क में आकर ही पाई जा सकती है।

(क्रमश:) **(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अकेलापन

समय बच गया नहीं तो हर समय उनकी सेवाओं में लगे रहते थे। आप ने देखा होगा प्रायः ऐसे लोग अनपढ़ होते हैं या आखिरी डिग्री के बाद कभी बुक नहीं उठाई अगर उठाई है तो दिखावे के लिये। आप इनके आगे बोल नहीं सकते, ये बहुत शक्तिशाली लोग होते हैं और बहुत करीब के लोग होते हैं। इनके प्रति भी शुभ भावना रखो और ज्ञान पाने की गति बढा दो और अपने काम पर लगे रहो। कभी ऐसे लोगों की निन्दा नहीं करो। ऐसे लोगों का इलाज भगवान या समय करता है। आप सिर्फ अपने दिमाग को चार्ज करते रहो ताकि आप सदा कल्याणकारी बन सकें।

कुछ भी जीवन में विपरीत होता है, बुरा बुरा लगता है, अकेलापन लगता है, कोई भी अच्छी प्राप्ति चाहते हैं, तुरंत बुद्धि पर ध्यान दो। तुरंत पढ़ो नहीं तो आप की बुद्धि धोखा देगी। बाबा मुरली पर जोर

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

''छान दिसता हो तुम्ही!''
हे ऐकून होणाऱ्या आनंदावर विरजण घालणारे पुढील दोन शब्द
''वयाच्या मानाने''

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'आयआरएफएल' ही कितवी नवरत्न कंपनी बनली आहे?

– २६ वी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'निमित्त...'

माझ्या मुलीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एका अनाथालयाला धान्य दिले तेव्हा आम्ही कॉलनी मेंबर त्या अनाथालयात गेलो होतो. आमच्या सोबत कॉलनीतील मुलं, मुलीसुध्दा होत्या. तेथील ती लहान, निरागस मुलं, मुली पाहुन आम्हाला वाईट वाटलं. काही मुला, मुलींना आई वडिल नव्हते. खरंतर माझ्या मुलीचा वाढदिवस हे निमित्त होतं आमच्या कॉलनीतील मुला, मुलींना अनाथालय दाखवण्याचं. आमच्या कॉलनीतील एका मुलाचा वाढदिवस त्याच महिन्यात, पुढील पाच दिवसांनी होता. तेव्हा त्या पालकांनीही मुलाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्या अनाथालयास किराणा माल देणार असल्याचे सांगितले. ह्या घटनेनंतर माझ्या लक्षात आलं की आपल्या जवळपासच्या काही व्यक्ती वेगवेगळ्या निमित्ताने (स्वतःचा वाढदिवस अथवा लग्नाचा वाढदिवस अथवा घरातील सदस्याचा वाढदिवस) अनाथालयाला जे जे आवश्यक आहे ते ते देतात, त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार, हे निश्चितच कौतुकास्पद, अनुकरणीय आहे. हे असं देण्याचं अनुकरण करायलाही निमित्त लागतं. मुळात आपल्या मनुष्यजन्माचं प्रयोजन नेमकं काय आहे? ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करावाच. ह्यासाठी कोणत्याही निमित्ताची गरज नाही.

हे माझ्या लक्षात आल्यानंतर मी, अनेकदा काही ठिकाणी कोणत्याही कारणाशिवाय – निमित्ताशिवाय, गरजुंना जे हवं ते दिलं आहे, देतो आहे आणि ह्यापुढेही देणारंच आहे. प्रत्येकवेळी निमित्तच पाहिजे असं काहीही नसतं – निमित्तच असावं ही धारणा आपण करुन घेतली आहे. एखाद्या निमित्ताने, आपलं एखाद्याच्या घरी जातो हे जेवढं गरजेचं आहे तेवढंच गरजेचं आहे कोणत्याही निमित्ताशिवाय त्या व्यक्तीच्या घरी जायला पाहिजे. परंतु अनेकजण निमित्ताची वाट पाहात असतात. एखादया निमित्ताने जाणं हे अपरिहार्य असतंच पण निमित्ताशिवाय एखाद्या व्यक्तीला, व्यक्तीसमुहाला भेटणं अथवा आपल्याकडुन जे शक्य होईल ते देणं महत्वाचं आहे. एक लक्षात घ्यायला हवं गरजंवताला हवं ते देण्यासाठी अथवा गरजवंताचं चांगलं होण्यासाठी आपण निमित्ता व्हायलाच पाहिजे कारण आपण 'माणूस' म्हणून जन्म घेतला आहे. समजा एखाद्याच्या बँक खात्यात लाखो रुपये पडुन आहेत आणि सदर व्यक्ती एक रुपयासुध्दा गरजुला देत नसेल तर त्याने जरुर विचार करावाच. दिल्याने कधीच काही पडत नसतं हे अनेक, मनापासुन देणारांनी सांगितले आहे. सामाजिक मान आणि जाण असणाऱ्या व्यक्ती, निमित्त असो अथवा निमित्त नसो, ती व्यक्ती अगदी आवर्जुन आपल्या कमाईतला काही भाग समाजाला देत असते कारण त्या व्यक्तीने अगदी मनापासून मान्य केलेलं असतं की मला जे काही मिळतं त्यात समाजाचंही योगदान आहेच. मुळात हा असा विचार करायला मन मोठं असावं लागतं. निमित्त असेल तरंच मी इतरांना काहीतरी देणार हा संकुचित विचार काहीही उपयोगाचा नाही. आपल्या दैनंदिन जीवनात जे काही घडतं, व्यक्ती भेटतात, विचार ऐकायला मिळतात ते काही निमित्त असतं म्हणूनच. 'साहित्य सहवास' च्या माध्यमातुन गेली १२ वर्षे मी, तुमच्यासोबत लेख, लघुकथेच्या माध्यमातुन आहे ह्याला निमित्त आहे प्रत्येक शनिवार. हे सगळं लिहिण्यासाठी मला प्रचंड वाचन करावं लागतं ह्यासाठी पुस्तकं खरेदी करावी लागतात, वाचावं लागतं. हे निमित्त माझ्यासाठी महत्वाचं आहे.

परिक्षा जवळ आली की अभ्यास करणारे विद्यार्थी आपल्याला दिसतात. परिक्षा हे निमित्त आहे. वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेणं, त्या विषयीचं वाचन, मनन, चिंतन करुन मुद्दे लिहिणं, लिहिलेलं पाठ करणं. आरशासमोर उभा राहुन ते बोलणं, कोणत्या शब्दांवर जोर द्यायचा, आवाजातील चढ उतार, चेहऱ्यावरील भाव भावना, समोरच्याच्या डोळ्यांत डोळे घालुन विषय मांडणं– हे सगळं निमित्त आहे वक्तृत्व स्पर्धेचं. अत्यंत महत्वाचं म्हणजे आपलं स्वतःचं भविष्य उज्वल होण्यासाठी आपण स्वतःच निमित्त असतो.

कारण करणं अथवा न करणं हे सर्वस्वी आपल्याच हातात असतं. माझ्या सुयशमार्ग ह्या प्रेरणादायी संवाद व्याख्यानात जे सांगतो, कृती करुन घेतो, अनुभुती देतो. हे सगळं ज्यांनी ज्यांनी अगदी मनापासून स्वीकारलं, मी सांगितलं त्यानुसार केलं ते काही विद्यार्थी चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरीला लागले. ह्या वास्तव उदाहरणात मी निमित्त आहे काहींचं भविष्य उज्वल करण्यासाठी आणि व्याख्यान हे माध्यम आहे मी अधिकाधिक विद्यार्थी, पालकांपर्यंत पोहचण्यासाठी. इतरांचं चांगलं होण्यासाठी आपण स्वतः निमित्त व्हावं ह्यासारखा आनंद नाही, सुख नाही, समाधान नाही. आपण, आपलं काम प्रामाणिकपणे करायचं हे निमित्त आहे स्वसह इतरांचंही भलं करण्यासाठी. खरं तर आपला मनुष्यजन्म हा निमित्त आहे. नेमकं कशाचं निमित्त आहे ? हा विचार केला तर खुप काही माहिती होईल.

ज्यांच्या बँक पासबुकची फक्त क्रेडीट साईड वाढली असे कितीजण आनंदी आहेत ? असे कितीजण सुखी – समाधानी आहेत ? पण ज्या व्यक्ती इतरांचं चांगलं होण्यासाठी निमित्त झाल्या आहेत त्यांचा आनंदी– समाधानी चेहरा पाहिला की आपल्या लक्षात येईल त्यांच्या बँकपासबुकची क्रेडिट साईड भलेही कमी असेल पण तरीसुध्दा ते मनाने श्रीमंत आहेत. मनाने श्रीमंत असणारांचा शोध घ्या. ही आपल्या चांगुलपणाची सुरुवात असेल, आपण चांगलं होण्यासाठीचं निमित्त असेल. इतरांचं चांगलं होण्यासाठी निमित्त होऊया.

(लेख क्र.५८६)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### बी जीवनसत्त्व

लहान बालकांना पोटामध्ये जंत झाले असतील तर अर्धा चमचा वावडिंगाचे चूर्ण ताकातून सलग तीन दिवस प्यायला दिल्यास कृमी शौचावाटे पडून जातात.

१०. केस कोरडे होऊन तुटत असतील, तर ताकाने केस धुतल्यास केस मऊ व चमकदार होतात.

११. चेहरा काळवंडणे, मुरमाचे डाग व चेहऱ्याचा चिकटपणा कमी करण्यासाठी ताकाने चेहरा धुवावा. याने चेहरा तेजस्वी आणि आकर्षक बनतो.

१२. ताकामध्ये 'बी' जीवनसत्त्व असल्यामुळे त्याच्या सेवनाने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून त्वचेचे आरोग्य सुधारून सौंदर्य टिकून राहते.

१३. वार्धक्य टाळून चिरतारुण्य टिकविण्यासाठी आहारामध्ये नियमित ताकाचे सेवन करावे. याने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होऊन त्वचेचा रंग उजळ होतो.

१४. शरीराचा बांधा सुडौल राहण्यासाठी जेवण करताना पाण्याऐवजी ताकाचे सेवन करावे. याने घेतलेल्या आहाराचे पचन सुरळीत होऊन वजन आटोक्यात राहते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# शालेय जीवनात संस्कारांची जोड आवश्यक

## वैद्य अनिकेत घोटणकर यांचे प्रतिपादन; दासनवमी निमित्त समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे उत्साहात आयोजन

नगर – शालेय जीवनात पारंपरिक शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना धार्मिक, संस्कारक्षम विचारांची ओळख करून देणे आणि समाजातील संतांचे विचार समजून सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी हे विचार प्रत्यक्ष जीवनात अंगीकारावेत, यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन गरजेचे आहे. या स्पर्धा म्हणजे समर्थांचा विचार, रामाची भक्ती आणि हनुमानाची व्यक्तिमत्त्वशक्ती यांचा त्रिवेणी संगम असल्याचे प्रतिपादन वैद्य अनिकेत घोटणकर यांनी केले.



समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमीनिमित्त दरवर्षी विविध स्पर्धांचे उद्घाटन समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक विभाग), सांगळे गल्ली येथे रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने उत्साहात पार पडले.

समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमी निमित्त दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धासोहळ्याचे उद्घाटन समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक विभाग), सांगळे गल्ली येथे रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने उत्साहात पार पडले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वैद्य अनिकेत घोटणकर, शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सदस्य सुनील जोशी, संध्याताई कुलकर्णी, मुख्याध्यापक सुनील कानडे, सावेडी प्रशालेच्या प्राचार्या सुद्धा जोशी, मुख्याध्यापक अजय महाजन, धनश्री गुंफेकर यांच्यासह शहरातील विविध शाळांचे शिक्षक, पालक व स्पर्धक उपस्थित होते.

पुढे बोलताना वैद्य अनिकेत घोटणकर म्हणाले की, समर्थ रामदासांचे विचार हे केवळ धार्मिक नसून ते जीवन घडविणारे आहेत. शिस्त, कष्ट, आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांची बीजे विद्यार्थीदशेतच रोवली गेली पाहिजेत. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर समर्थ विचारांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरते. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा मिळते.

समर्थ विद्या प्रसारक मंडळ गेल्या ५० वर्षांपासून नगर शहरात या स्पर्धांचे सातत्याने आयोजन करत असून या उपक्रमाला दरवर्षी शहरातील विविध शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यावर्षी निबंध, हस्ताक्षर, चित्रकला, पाठांतर, वक्तृत्व आणि गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील सुमारे ४०० ते ५०० विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक अजय महाजन यांनी समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, आजचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे असावे, हीच काळाची गरज आहे. समर्थ रामदास स्वामींचे विचार हे विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. शिस्त, परिश्रम, स्वावलंबन, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये समर्थ विचारांतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून निष्ठेने करत आहे.

पुढे ते म्हणाले की, दासनवमी निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. निबंध, वक्तृत्व, चित्रकला, गायन, पाठांतर अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला चालना मिळते. स्पर्धा जिंकणे महत्त्वाचे असले तरी सहभागातून मिळणारा आत्मविश्वास, शिस्त आणि संस्कार हेच खरे यश आहे. पालक, शिक्षक आणि संस्थेच्या सहकार्यामुळेच हा उपक्रम सातत्याने यशस्वीपणे राबवता येत आहे.

शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार करणारा हा ज्ञानरूपी यज्ञ सर्वांच्या सहकार्याने आजपर्यंत अखंडपणे सुरू आहे आणि भविष्यातही तो अविरतपणे चालू राहील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता पांडव यांनी केले. लीना बंगाळ यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## प्रसंग, व्यासंग आणि सत्संग

“मुसाफिर”
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

प्रपंच आणि परमार्थ ह्या दोन अवस्था परस्पर भिन्न आहेत. ज्याला परमार्थ करायचा आहे त्याने प्रपंच त्यागलाच पाहिजे अशीही धारणा काही जण प्रकर्षाने मांडतात कारण प्रपंचात 'संग' आहे तर परमार्थात 'निःसंग!' पण एकाचवेळी माणूस प्रपंच आणि परमार्थ ह्या दोन्ही अवस्था अनुभवू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत.

परमार्थ साधनेसाठी 'निःसंग' व्हायला हवे असे भगवद्गीतेनेही म्हटले आहे. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील,

'निर्मानमोहा जितसङ्गदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः '

हा श्लोक सर्वांच्या परिचयाचा आहे. ज्याने 'संग' म्हणजे 'आसक्ती दोष' त्यागला आहे, हा संगदोष ज्याने जिंकला आहे तेच परमात्म्याचे स्वरूप पाहण्यासाठी तत्पर आहेत, कारण विकृतीच्या सर्व घटकांचा जन्म त्या संगात दडला आहे.

'ध्यायतोविषयान्पुंसः संगस्तेषूपजायते'
(गीता २/६२)

ह्या श्लोकात संगातून पुढे काय काय ओढवते याचे वास्तव चिंतन मांडले आहे. विषयाचे ध्यान करणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणी त्या विषयाचा संग जडतो. पुढे ह्या संगातून काम, कामातून क्रोध, क्रोधातून मोह, अविवेक, त्यातून पुढे स्मृतिभ्रंश, पुढे बुद्धिचा नाश आणि बुद्धिनाश म्हणजे आत्मनाशच.

हे सारे विकार एका संगातून घडतात. संग म्हणजे आसक्ती ! गीतेने 'संग' शब्दावर भाष्य करताना संगापासून नव्हे तर संगदोषापासून मुक्त व्हायला सांगितले आहे. संग म्हणजे आसक्ती, ही जशी विषयांची असू शकते तशीच विवेकाचीही असू शकते.

सद्गुणांचीही आसक्ती असू शकते आणि दुर्गुणांचीही. आपण निःसंग व्हावे असे जरी पारमार्थिक तत्त्व असले तरी सदाचारी जीवनासाठी काही संग जडावेच लागतात. प्रामुख्याने तीन संग जडले की माणूस सदाचारी, विवेकी आणि आनंदी होतो. ते तीन संग म्हणजे १) प्रसंग २) व्यासंग ३) सत्संग होय.

माणसाच्या नित्याच्या जीवनात असा एखादा प्रसंग घडतो की त्याचे मन आपोआप सकारात्मक गोष्टीकडे वळू लागते. पुढे त्याच्याठायी त्या विषयीची विवेकभावना निर्माण होऊन त्याचा व्यासंग वाढतो आणि एखाद्या महापुरुषाचा बोध होऊन त्याला सत्संग लाभतो आणि त्याचे जीवनच बदलून जाते. ह्या तीन संगांनी नेमके काय घडते? प्रसंग माणसाचे मन घडवितो. व्यासंग माणसाची बुद्धी घडवतो तर सत्संग माणसाचे जीवनच घडवतो, हेच खरे.

– किशोर गांधी

# 'राष्ट्रीय उर्दू परिषदें'साठी नगरच्या डॉ. कमर सुरुर यांना निमंत्रण



नगर – भोपालमध्ये 'जश्न–ए–उर्दू' चा साहित्यिक उत्सव उर्दू भाषा, साहित्य, संस्कृती, कला आणि 'आत्मबोध से विश्वबोध' या संकल्पनेवर आधारित 'जश्न–ए–उर्दू' या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन २ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता भोपाल येथे करण्यात आले आहे. यासाठी नगर येथील उर्दू साहित्यिक शायरा डॉ.कमर सुरुर यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

कारवां लिटरेरी ओपन माईक, छत्तीसगड भोपाल यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख अतिथी म्हणून धर्मेंद्र सिंह लोधी उपस्थित राहणार आहेत. 'चिलमन व्याख्यान' सत्रात भोपाल, दिल्ली, लखनौ, महाराष्ट्र आदी राज्यांतील अभ्यासक विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. उर्दूच्या ऐतिहासिक साहित्यिक परंपरा, आत्मनिर्भरतेचा प्रवास तसेच स्त्रीविमर्श यावर सखोल चर्चा होणार आहे. यानंतर मुशायरा शायरात सत्रात देशातील नामवंत कवी व कवयित्री सहभागी होणार असून, श्रोत्यांना उर्दू शायरीचा मनमोहक अनुभव मिळणार आहे.

हा कार्यक्रम मध्यप्रदेश उर्दू अकादमी, मध्यप्रदेश संस्कृती परिषद, संस्कृती विभाग आणि आयुक्त संचालनालय पुरातत्त्व अभिलेखागार व संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. नुसरत मेहदी (निदेशक) करत आहेत.

# 'कर्नल परब'स् शाळेत आर्ट अॅण्ड क्राफ्ट प्रदर्शनाला प्रतिसाद

नगर – शहरातील 'कर्नल परब'स् शाळेमध्ये यंदाही विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देणाऱ्या आर्ट अॅण्ड क्राफ्ट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून या प्रदर्शनाला पालकांसह नागरिकांचा प्रतिसाद लाभला. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे आकर्षक प्रदर्शन यावेळी भरवण्यात आले होते.



शहरातील 'कर्नल परब'स् शाळेमध्ये कलागुणांना वाव देणाऱ्या आर्ट अॅण्ड क्राफ्ट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून या प्रदर्शनाला पालकांसह नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

यावर्षी प्रदर्शनासाठी 'स्पेक्ट्रम' ही संकल्पना (थीम) निवडण्यात आली होती. या थीमनुसार विद्यार्थ्यांनी रंग, कल्पना आणि सर्जनशीलतेचा सुरेख मिलाफ साधत विविध डिस्प्ले साकारले. कागद, माती, रंग, पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर करून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

'कर्नल परब'स शाळेच्या संचालिका गीता परब या दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कला गुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच शिक्षणाबरोबरच कला ही जीवनात किती महत्त्वाची आहे हे विद्यार्थ्यांना कळावे, या उद्देशाने अशा प्रकारच्या प्रदर्शनाचे आयोजन करत असतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना चालना मिळते, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

प्रमुखाध्यापिका अर्पिता रननवरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांचा विकास व्हावा, तसेच त्यांनी स्वतःच्या कल्पनांना प्रत्यक्ष स्वरूप द्यावे, यासाठी हे प्रदर्शन आयोजित करण्यात येते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागतो.

प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या पालकांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंची खरेदी करत प्रदर्शनाचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांच्या हॅन्डमेड वस्तूंना मोठी मागणी असून, भविष्यातही अशाच प्रकारचे प्रदर्शन सातत्याने भरवावे, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली.

विशेष आकर्षण ठरले ते सनबीम्सच्या लहान विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पिगी बँक, कुल्लड, तसेच विविध प्रकारच्या फुलांच्या बिया. या वस्तूंनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या प्रदर्शनामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आनंदी व उत्साही वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि अभिमान झळकत होता.


श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बागरोजाचा इतिहास जाणून घेतला,

# श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतला बागरोजाचा इतिहास

निंबळक – नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित ऐतिहासिक स्थळे संवर्धन अंतर्गत १ दिवसीय कार्यशाळा अहिल्यानगर मधील बागरोजा येथे २९ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमध्ये छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इतर महाविद्यालयांमधील ५४ विद्यार्थी आणि ३ शिक्षक सहभागी झाले होते. या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांच्यासमवेत इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा. नवनाथ वाव्हळ हे देखील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना जिल्ह्यातील एक महत्त्वाची वास्तू असणाऱ्या बागरोजाचा इतिहास, निर्मिती, अष्टभुजाकार आकारात असणाऱ्या या इमारतीतील वास्तुकला, निजामकालीन या वास्तुशी निगडित जलव्यवस्थापन व नगरच्या इतिहासातील महत्व इत्यादींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

ही १ दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानाविषयी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. तेजश्री धंगेकर आदींनी मेहनत घेतली. कार्यशाळा झाल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली.

# बौद्ध समाजातील संस्थांच्या पायाभूत सुविधांसाठी अनुदान योजनेसाठी २० फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करा

नगर – राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या, तसेच ५१ टक्क्यांपेक्षा जास्त विश्वस्त किंवा सदस्य संख्या बौद्ध समाजातील असलेल्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांना पायाभूत सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र व इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव २० फेब्रुवारी पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी केले आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या २४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ही योजना राबविण्यात येत असून, संबंधित संस्थांना या योजनेंतर्गत कमाल पाच वेळा अनुदान मंजूर होऊ शकणार आहे. या योजनेअंतर्गत इमारतीचे किरकोळ नूतनीकरण व डागडुजी, विपश्यना केंद्राचे नूतनीकरण, प्रशिक्षण केंद्राचे नूतनीकरण तसेच कार्यशाळा किंवा सभागृहाचे बांधकाम, सुशोभिकरण यासाठी अनुदान देण्यात येईल. (मात्र, या बाबी भाडेतत्त्वावरील इमारतींसाठी लागू राहणार नाहीत). तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रंथालय, वाचनालय व अभ्यासिका अद्ययावत करणे, संगणक कक्ष उभारणे, प्रसाधनगृह व स्वच्छतागृह उभारणे अथवा डागडुजी, संस्थेसाठी आवश्यक फर्निचर, संशोधन केंद्रासाठी (रिसर्च सेंटर) साहित्य व संगणक खरेदी, जनरेटर/इनव्हर्टर, सोलार सुविधा आणि सुरक्षा कॅमेरे बसविण्यासाठी देखील अनुदान देण्यात येणार आहे.

इच्छुक व पात्र संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज 'जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर' येथे सादर करावेत. शासन निर्णय तसेच अर्जाचा नमुना https://gr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून दिलेल्या मुदतीनंतर कोणत्याही प्रस्तावास मुदतवाढ दिली जाणार नाही, याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी, असेही जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कळविले आहे.

# भारतीय जनता पार्टी, नगरच्या शहर वकील आघाडीची घोषणा

नगर – भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहराच्या वकील आघाडीची नूतन कार्यकारिणी शहर जिल्हाध्यक्ष अॅड. चंदन बारटक्के यांनी नुकतीच जाहीर केली आहे. या कार्यकर्ते मध्ये तीन उपाध्यक्ष, तीन सरचिटणीस, तीन चिटणीस व कार्यकारी सदस्यांचा समावेश आहे.

वकील आघाडीची शहर जिल्हा कार्यकारणी पुढील प्रमाणे – उपाध्यक्ष संदीप काळे, सौरभ राऊत, संतोष भोसे., सरचिटणीस – सचिन घावटे, किसन वनारसे व रवींद्र लगड., चिटणीस – हरेश कल्याणी, आशिष पोटे व निखिल मुसळे., कार्यकारी सदस्य वेंकटेश शिरसुल, कैलास कोतकर, विजय महाजन, रुपेशकुमार भांबरे, योगेश मांडोत, निखिल सुपेकर, देवेंद्र बंब व गणेश शर्मा आदींचा समावेश आहे.

कार्यकारणीचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, सुजय विखे, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते आदींसह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.


पांढरीपुल येथून शांतिलाल बनबेरू यांनी सुरू केलेल्या 'आशा भेळ'ने २६ जानेवारी रोजी केवळ २६ रुपयांत भेळ या उपक्रम राबविला, अशी माहिती रमेशलाल बनबेरू (संचालक) दिली.




वळपुरी (ता. पारनेर) येथे संत रामपालजी महाराज यांच्या आश्रमात कबीर परमेश्वर निर्वाण दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शेजारील छायाचित्रात तीन दिवसीय धार्मिक सोहळ्यास राज्यासह देशाच्या विविध भागांतून आलेल्या लाखो भक्तांनी उपस्थिती लावून संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला होता.

# ढवळपुरीत भक्तिसागर उसळला; संत रामपालजी महाराजांच्या संदेशाने भाविक मंत्रमुग्ध

## कबीर परमेश्वर निर्वाण दिनानिमित्त तीन दिवसांचा धार्मिक व सामाजिक सोहळा, लाखो भक्तांची उपस्थिती

नगर – ढवळपुरी (ता. पारनेर) येथे संत रामपालजी महाराज यांच्या आश्रमात कबीर परमेश्वर निर्वाण दिनानिमित्त २७ ते २९ जानेवारी दरम्यान भंडाऱ्यासह धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसीय धार्मिक सोहळ्यास राज्यासह देशाच्या विविध भागांतून आलेल्या लाखो भक्तांनी उपस्थिती लावून संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला होता. सत्संग, भजन–कीर्तन, प्रवचन, महाप्रसाद तसेच विविध सामाजिक उपक्रमांमुळे हा कार्यक्रम रंगला होता.

तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात दररोज सकाळपासून रात्री उशिरापर्यंत संत रामपालजी महाराज यांच्या विचारधारेवर आधारित सत्संग व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व धर्म समभाव, मानवता हाच खरा धर्म हा संदेश सतत अधोरेखित करण्यात आला. भक्तांना अंधश्रद्धा, व्यसनमुक्त जीवन, सत्य व सदाचाराच्या मार्गावर चालण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. भजन–कीर्तनामुळे संपूर्ण आश्रम परिसरात भक्तिरसाचा दरवळ पसरला होता.

या धार्मिक सोहळ्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. अनेक भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजासाठी योगदान दिले. यासोबतच अनेक जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा पार पडला. हुंडा प्रथेचा विरोध, साधेपणा आणि समानतेचा संदेश देणारा हा विवाह सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमादरम्यान संत रामपालजी महाराज यांच्या शिकवणीनुसार निरोगी, निर्व्यसनी जीवनशैली स्वीकारणे, सर्व जाती–धर्मांचा सन्मान राखणे, समाजात समता व बंधुभाव वाढवणे, महिलांचा सन्मान आणि सामाजिक एकोप्याचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विविध धर्मांचे पवित्र ग्रंथ येथे प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले होते, ज्यातून सर्वधर्मीय ऐक्याचा संदेश देण्यात आला.

महाप्रसादासाठी लाखो भक्तांनी शिस्तबद्ध रांगा लावल्या होत्या. आश्रमातील स्वयंसेवकांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे एवढ्या मोठ्या संख्येतील भक्तांची उपस्थिती असूनही कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडले. सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा व वैद्यकीय सुविधांची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. ढवळपुरी परिसरात या तीन दिवसांत जणू भक्तिसागर उसळला होता. धार्मिक, सामाजिक आणि मानवतावादी विचारांचा संगम असलेला हा सोहळा समाजाला सकारात्मक दिशा देणारा व प्रेरणादायी ठरल्याची भावना भक्तांनी व्यक्त केली.



कनोजिया परदेशी समाज महिला मंडळच्या वतीने भिंगार येथील मथुरानगर मध्ये हळदी कुंकवाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास समाजातील महिलांनी उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

## कनोजिया परदेशी समाज महिला मंडळाचा हळदी-कुंकू

नगर – कनोजिया परदेशी समाज महिला मंडळच्या वतीने भिंगार येथील मथुरानगर मध्ये हळदी कुंकवाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास समाजातील महिलांनी उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

महिलांनी कार्यक्रमात सहभागी होत एकमेकींना वान देऊन शुभेच्छा दिल्या. हळदी कुंकवासाठी आलेल्या महिलांचे स्वागत करून त्यांना वाण देण्यात आले. यावेळी महिलांनी एकमेकींशी विचारांची देवाण-घेवाण करीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

तसेच यावेळी महिलांसाठी लकी ड्रॉ काढून बक्षीस वाटप करण्यात आले. यामध्ये राधा कनोजिया, रेखा कनोजिया, रामेश्वरी कनोजिया, सावित्री कनोजिया, शारदा कनोजिया, नीलम कनोजिया, वैशाली परदेशी, वनिता परदेशी, दीपमाला कनोजिया, वैशाली परदेशी, तेजश्री कनोजिया, प्रिया कनोजिया, भावना कनोजिया, पूजा कनोजिया, लीना परदेशी, अरुणा कनोजिया, खुशी कनोजिया, मोना किल्लेकर यांना बक्षिसे मिळाली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी परदेशी कनोजिया महिला मंडळाच्या सदस्यांनी तसेच सेवा मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# निरंकारी सतगुरुंच्या पावन सान्निध्यात आयोजित सामूहिक विवाह समारोहात ८२ जोडपी विवाहबद्ध

नगर – निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सानिध्यात आयोजित सामूहिक विवाह समारोहामध्ये महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांसह देशभरातील अनेक राज्यांतून आलेल्या ८२ जोडप्यांचा सामूहिक विवाह झाला. महाराष्ट्राच्या ५९व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची विधिवत सांगता झाल्यानंतर सांगलवाडी, सांगली येथील समागम मैदानावरच या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सानिध्यात आयोजित सामूहिक विवाह समारोहामध्ये महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांसह देशभरातील अनेक राज्यांतून आलेल्या ८२ जोडप्यांचा सामूहिक विवाह झाला.

या विवाह सोहळ्यामध्ये आपले पावन आशीर्वाद प्रदान करताना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी वधू-वरांचे अभिनंदन करुन गृहस्थ जीवनातील जबाबदाऱ्या समजून घेऊन त्या एकोप्याने, आदराने व प्रेमाने कुशलपणे निभावण्याची शिकवण दिली. आपल्या सामाजिक दायित्वांचा निर्वाह करत असतानाच सदोदित सेवा, सिमरण, सत्संगाशी जोडून राहून एकमेकांच्या सहयोगाने आपली भक्ती आणखी मजबूत करण्याची प्रेरणा दिली.

या सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये पारंपारिक जयमाला तसेच निरंकारी विवाहाचे विशेष चिन्ह सांझा-हार (सामायिक हार) प्रत्येक जोडीच्या गळ्यामध्ये मिशनच्या प्रतिनिधींमार्फत घालण्यात आले. त्यानंतर आदर्श गृहस्थ जीवन जगण्याची शिकवण प्रदान करणाऱ्या निरंकारी लावांचे सुमधूर गायन करण्यात आले.

समारोहामध्ये सतगुरु माताजी व निरंकारी राजपिता जी यांनी वधूवरांवर पुष्प-वर्षाव करुन आपला दिव्य आशीर्वाद प्रदान केला. कार्यक्रमात उपस्थित वधू-वरांशी संबंधित कुटुंबीय आणि साध संगतने देखील पुष्प-वर्षाव केला. निश्चितपणे हे एक विलोभनीय दृश्य होते.

आजच्या या विवाह सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कोल्हापुर, सोलापुर, धाराशिव, मुंबई, ठाणे, पुणे, डोंबिवली, पालघर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नाशिक, लातुर, बीड, परभणी, नागपुर, वर्धा, गोंदिया, रत्नागिरी एवं सिंधुदुर्ग तसेच अन्य राज्यांपैकी उत्तर प्रदेशातील गोरखपुर, गाजीपुर व अलाहाबाद, कर्नाटकातील बेळगावी, उडुप्पी (कोंडापुर) आणि छत्तीसगड़ येथील अंबिकापुर (सुरगुजा) इत्यादी ठिकाणांहून आलेल्या ८२ जोडप्यांचा समावेश होता.

उल्लेखनीय आहे की या साध्या विवाह समारंभात अनेक पदवीधर, पदव्यूत्तर पदवीधर आणि उच्च शिक्षित वधू-वरांचा समावेश होता. काही परिवार असेही होते जे आपल्या मुलांचे विवाह मोठ्या थाटामाटात करु शकत होते. परंतु त्यांनी सतगुरुंच्या पावन छत्रछायेमध्ये त्यांच्या दिव्य शिकवणीचा अंगीकार करत साध्या पद्धतीने विवाह करुन समाजासमोर एक आदर्श उदाहरण प्रस्तुत केले. निश्चितपणे साध्या विवाहांचे हे विलोभनीय दृश्य जाती-वर्ण इत्यादिंची विषमता दूर करुन एकत्वाचा सुंदर संदेश प्रस्तुत करत होते, जो संत निरंकारी मिशनचा संदेशदेखील आहे.

# आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्यावतीने 'एचव्हीएसीमधील नवीनतम संशोधन' या विषयावर व्याख्यान

नगर – आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर, जी टेक इंजिनिअरिंग सोल्यूशन आणि डायकिन एअर कंडीशनिंग यांच्या संयुक्त विद्यमाने 'एच व्ही ए सी (Heating, Ventilation and Air Conditioning) मधील नवीनतम संशोधन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.





'एचव्हीएसीमधील नवीनतम संशोधन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – लहू दळवी)

डायकिन एसी हा आंतरराष्ट्रीयस्तरावर ब्रँड असून, ग्राहकांच्या गरजा आणि तांत्रिक मागण्यांचा अभ्यास करून कंपनी सातत्याने नवनवीन आणि कार्यक्षम उत्पादने बाजारात आणत आहे. या नव्या तंत्रज्ञानाची आणि संशोधनाची माहिती शहरातील आर्किटेक्ट्स आणि इंजिनिअर्स सभासदांना व्हावी, या उद्देशाने डायकिन महाराष्ट्र व गोवा विभागाचे प्रमुख अर्पित अकोटिया यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान आयोजित करण्यात आले.

अर्पित अकोटिया यांनी आपल्या सादरीकरणात सांगितले की, डायकिन एसीमध्ये कंफर्ट, एअर क्वालिटी, रीलायबिलिटी आणि इफिशियन्सी यांना सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. कंपनी रहिवासी, औद्योगिक, व्यावसायिक तसेच शैक्षणिक संस्थांसाठी विविध क्षमतेचे व गरजेनुसार सुसज्ज एअर कंडिशनिंग सोल्यूशन्स उपलब्ध करते, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, जपानमध्ये स्थापन झालेली ही कंपनी आज जागतिक स्तरावर अग्रगण्य असून, भारतातही स्वतःचे संशोधन केंद्र कार्यरत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिरीष भोळे यांनी सांगितले की, जी टेक इंजिनिअरिंग सोल्यूशन हे डायकिन एसीचे अहिल्यानगरमधील अधिकृत विक्रेते व सेवा प्रदाते आहेत. लक्ष्मीकांत बडे आणि मी, मागील वीस वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहोत, असे ते म्हणाले.

कार्यक्रमास पीडब्ल्यूडीचे सुपरिटेंडट इंजिनिअर विवेक मुलांडे, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर लक्ष्मीकांत जाधव व युवराज कोकरे, डायकिनचे डिलर लक्ष्मीकांत बडे व शिरीष भोळे, तसेच असोसिएशनचे अध्यक्ष अभिजीत देवी, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव यांच्यासह सुनिल औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, संकेत पादीर, जितेश सचदेव, सुनिल जाधव, गौरव मांडगे, अनमोल जैन, सचिन डागा, बाबूजी ससाणे, अजिंक्य बालटे, अशोक मवाळ, नागेश खुरपे, अनिल लवांडे, अरविंद वाबळे, संभाजी वाघ व इतर सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनात अंकुश पालवे (एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, नंदुरबार पीडब्ल्यूडी) आणि वैभव बाहेकर यांनी महत्वाची भूमिका बजावली. अध्यक्ष अभिजीत देवी यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले, आर. जे. प्रसन्न यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

लक्ष्मीकांत बडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शेवटी त्यांनी सभासदांना आवाहन केले की, सावेडी येथील आमच्या शो-रूमला भेट द्यावी, जिथे डायकिनच्या व्हीआरव्ही सिस्टीमची सविस्तर माहिती व कार्यप्रणाली प्रत्यक्ष पाहता येईल, असे त्यांनी सांगितले.

## 'राष्ट्रीय शालेय तलवारबाजी'साठी कु. श्वेता गोडळकर हिची निवड

नगर – क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर द्वारा राज्यस्तरीय १९ वर्षे वयोगट शालेय तलवारबाजी (मुली) स्पर्धा ११ ते १२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेत महाविद्यालयातील कु. श्वेता गोडळकर (१२ वी कला) हिने सांघिक फॉइल (मुली) या क्रीडा प्रकारात रौप्यपदक प्राप्त केले. तसेच वैयक्तिक प्रकारात कांस्यपदक प्राप्त केले. तिची मणिपूर येथे २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.



कु. श्वेता गोडळकर हिचे महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन स्नेहलताई शिंदे, सदस्य आ. आशुतोष काळे, सदस्य माजी आमदार अशोकराव काळे, महाविद्यालयीन विकास समिती सर्व सदस्य, प्राचार्य डॉ.शंकर थोपटे, उपप्राचार्य डॉ.भूपेंद्र निकाळजे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. अनिल जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक, माजी विद्यार्थिनी आणि विद्यार्थिनींनी अभिनंदन केले. कु. श्वेता गोडळकर हिला शारीरिक शिक्षण संचालक प्रा.विलास एलके व वैष्णवी गोडळकर यांचे मार्गदर्शन लाभले.



स्नेहंबधतर्फे पोलीस रेझिंग डे निमित्त जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, निशांत पानसरे, सचिन पेंडुरकर.

# चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून पोलीसांविषयी 'सकारात्मकता' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

**पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे प्रतिपादन; स्नेहंबधतर्फे पोलीस रेझिंग डे निमित्त चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण**

नगर – पोलीस रेझिंग डे निमित्त चित्रकला स्पर्धा आयोजित करून समाजात पोलीसांप्रती आदरभाव निर्माण केला. पोलीसांविषयी सकारात्मक विचारभाव प्रस्थापित करण्याचा चांगला प्रयत्न केला. त्याबद्दल स्नेहबंध फाउंडेशनचे आभार, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

पोलीस रेझिंग डे निमित्त स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने शालेय गटासाठी जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस उपअधीक्षक (गृह) रवींद्र देशमुख, स्नेहबंध फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, सुप्रिया खामकर, सुजाता पुंड, निशांत पानसरे, सचिन पेंडुरकर, स्वयंम बास्कर आदी उपस्थित होते. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

### शांतता आणि सलोखा राखण्यासाठी पोलिसांची गरज – डॉ. उद्धव शिंदे

लोकांना जशी उपचारासाठी डॉक्टरची गरज असते, इमारतींच्या बांधकामासाठी इंजिनिअरची गरज असते, त्याचप्रमाणे आजूबाजूच्या परिसरात शांतता आणि सलोखा राखण्यासाठी पोलिसांची गरज असते. आपल्या समाजात विविध प्रकारचे लोक एकत्र राहतात आणि एकत्र राहण्याने त्यांच्यासाठी परस्पर संघर्ष देखील वाढू शकतो. त्यामुळे समाजात शांतता राखण्यासाठी आणि कोणत्याही प्रकारचे गुन्हे घडू नयेत यासाठी पोलीस रात्रंदिवस काम करतात, असे डॉ. उद्धव शिंदे यावेळी म्हणाले.

**चित्रकला स्पर्धेतील विजेते :** लहान गट (एलकेजी) प्रथम क्रमांक– ईशानी अमित खामकर, (१ ली) प्रथम– मयंक गणेश पुंड, प्राथमिक गट –प्रथम–श्रुतिका पाखरे, द्वितीय–अक्षरा पठारे, तृतीय–आदिती बडे माध्यमिक गट–प्रथम– सुयश वराडे, द्वितीय– रुमा कुंभार, तृतीय– आलिया सय्यद.

# सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे भिंगारमध्ये स्वागत; दर्शनासाठी भाविकांची झाली गर्दी

**समर्थ रामदास स्वामी यांनी समाजाला धर्म, राष्ट्रभक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखवला : ज्योत्स्ना मुंगी यांचे प्रतिपादन**

नगर – भिंगार परिसरात सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पवित्र पादुकांचे आगमन भक्तिभावात व उत्साहात करण्यात आले. भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा ज्योत्स्ना मुंगी यांच्या वतीने या पादुकांचे स्वागत भक्तीमय वातावरणात करण्यात आले.



भिंगार येथील ज्योत्स्ना मुंगी यांच्या निवासस्थानी श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांचे आगमन होताच पादुकांच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

ज्योत्स्ना मुंगी यांच्या निवासस्थानी श्री समर्थ राम दास स्वामी यांच्या पादुकांचे आगमन होताच पादुकांच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी श्रद्धेने दर्शन घेतले. या वेळी श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांचे पूजन नेहा मुंगी व जान्हवी मुंगी यांच्या हस्ते पार पडले. पद्यपूजनाचा विधी क्षीरसागर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या कार्यक्रमास श्रीपाद मुंगी, स्नेहबंध फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, अमित खामकर, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ. विलास देशमुख, चेतन वसगडेकर यांच्यासह महिला कार्यकर्त्या सुशीला मुळे, संगीता मुळे, नीलिमा धर्माधिकारी आदी उपस्थित होते. तसेच योग गुरू रामचंद्र लोखंडे हे सपत्नीक उपस्थित होते. भाविकांनी 'श्री राम जय राम जय जय राम' या नामघोषात पादुकांचे दर्शन घेतले. ज्योत्स्ना मुंगी म्हणाल्या की, सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पवित्र पादुकांच्या आगमनाने संपूर्ण परिसर भक्तीने संचारला. या पादुकांच्या स्वागताचे भाग्य लाभले हे महत्त्वाचे आहे. समर्थ रामदास स्वामी यांनी समाजाला धर्म, राष्ट्रभक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांवर चालणे, हेच आजच्या काळातील खरे समाजकार्य आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात अध्यात्मिक मूल्यांची फार मोठी गरज आहे. अशा पवित्र पादुकांच्या दर्शनाने मनाला शांती, सकारात्मक ऊर्जा आणि जीवनात योग्य दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

## आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – फिर्यादी व आरोपी सोमनाथ गंगाराम सातपुते यांचे दरम्यान मैत्रीचे व घरगुती चांगले संबंध असल्याने आरोपी यांनी फिर्यादीकडे रक्कम रु. २,५०,००० ची आवश्यकता असल्याने फिर्यादीकडे मागणी केली. त्यानुसार फिर्यादीने आरोपीस रक्कम रु.१,००,००० चेकद्वारे व रक्कम रु. १,५०,००० रोख स्वरुपात दिले. आरोपीने सदरची रक्कम परत करण्याकरीता फिर्यादीला आरोपीचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा नेप्ती, अ.नगर या बँकेचा २८/०२/२०२३ रोजीचा रक्कम रु.२,५०,००० चा चेक फिर्यादीस दिला होता व सदरील चेक निश्चित वटेल अशी खात्री व भरवसा आरोपीने फिर्यादीस दिला होता. त्यानंतर फिर्यादी यांनी सदरचा चेक त्यांचे खाते असलेल्या दि. वैद्यनाथ अर्बन को. ऑप बँक लि., परळी, शाखा पटवर्धन चौक, अहमदनगर या बँकेत भरला असता सदरचा चेक ०४/०३/२०२५ रोजी न वटता परत आला.

त्यामुळे फिर्यादी यांनी अहमदनगर येथील चिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट यांचे न्यायालयात आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली. आरोपी यांच्या तर्फे ॲड. आकाश राजेश कावरे यांनी युक्तीवाद केला. फिर्यादीची गुणदोषावर चौकशी होवून ॲड. आकाश राजेश कावरे यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन चिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट कोर्ट नं. १२ एम. ए. हुसेन यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात फिर्यादी यांचे वतीने ॲड. आकाश राजेश कावरे यांनी बाजु मांडली.

# 'नेप्ती विद्यालयात भारत स्काऊट गाईड उपक्रमांतर्गत' 'आनंदी बाजार'चे आयोजन, ग्रामस्थांकडून प्रतिसाद

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती विद्यालयात भारत स्काऊट गाईड उपक्रमांतर्गत 'आनंदी बाजार' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या या बाजाराला ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण करणे, स्वावलंबनाची शिकवण देणे तसेच व्यवहारज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल उभारून खरेदी-विक्रीचा अनुभव घेतला.

याचे उद्घाटन माजी सरपंच दिलीपराव होळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जमीर सय्यद, रामदास फुले, पाराजी चौरे, प्रा.एकनाथ होले, लहू फुले, मुख्याध्यापक महेश जाधव, नानासाहेब घोडके, राजेंद्र झावरे, बाबासाहेब भोर, गोरक्ष कोतकर, संतोष खरमाळे, शिवाजी जाधव, बाबूलाल सय्यद, राधा वामन, सविता कोरडे, श्रद्धा भांड, शिक्षक, सेवकवृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, स्वावलंबन व सामाजिक जाणीव वृद्धिंगत



नेप्ती विद्यालयात भारत स्काऊट गाईड उपक्रमांतर्गत 'आनंदी बाजार'चे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, सजावटीचे साहित्य, खेळणी, कागदी साहित्य अशा विविध वस्तूंचे आकर्षक स्टॉल लावले होते. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी स्वतः किंमत ठरवून ग्राहकांशी संवाद साधत व्यवहार केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना पैशाचे महत्त्व, नियोजन, ग्राहकसेवा व संघभावना यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. आनंदी बाजारसारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारिक शिक्षण मिळावे, यासाठी असे उपक्रम आवश्यक आहेत. स्काऊट गाईड चळवळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण व समाजभान निर्माण होते. या उपक्रमाला पालक व ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व मेहनतीचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षकवृंद, स्काऊट गाईड स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.




# गुडघेदुखीवर नेमका उपाय काय?

आरोग्यमंत्र

गुडघेदुखीचा त्रास असेल, तर ती संधिवात किंवा ऑस्टियोआर्थ्रायटिस असू शकते. या आजारासाठी औषधे सहसा दीर्घकाळ काम करत नाहीत, म्हणून गुडघेदुखी असलेल्या रुग्णांना गुडघा बदलण्याची शिफारस करतात; पण प्रत्येक रुग्णाला गुडघा बदलण्याची आवश्यकता आहे का? इंजेक्शन किंवा कार्टिलेज बदलणे देखील काम करू शकते का? प्रत्येक रुग्णाची स्थिती वेगळी असते. गुडघेदुखी असलेल्या रुग्णांकडे औषधांपासून संपूर्ण गुडघा बदलण्यापर्यंतचे पर्याय आहेत. रोबोटिक शस्त्रक्रिया आता उपलब्ध आहे. त्यामुळे गुडघा बदलण्याची प्रक्रिया काही प्रमाणात करता येते. गुडघ्याच्या दुखापतीचे मुख्य कारण ऑस्टियोआर्थ्रायटिस आहे. तो एक प्रकारचा संधिवात आहे. शिवाय, वयानुसार कूर्च्यांची झीज, जास्त वजनामुळे सांध्यावर जास्त दबाव, जुन्या दुखापती किंवा फ्रॅक्चर आणि कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीची कमतरता या सर्वांमुळे गुडघ्याचे नुकसान होऊ शकते. हे गुडघ्याच्या हाडांमधील कूर्चाच्या झीज आणि फाटण्यामुळे होते. समस्या लवकर आढळली आणि रुग्णाने सौम्य वेदना होताच डॉक्टरांचा सल्ला घेतला तर फिजिओथेरपी, गुडघे मजबूत करण्याचे व्यायाम आणि कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स सारखी औषधे रोग वाढण्यापासून रोखू शकतात. तथापि, वेदना दुर्लक्षित केल्या गेल्या तर समस्या आणखी वाढते. अशा परिस्थितीत, इंजेक्शनपासून शस्त्रक्रियेपर्यंत इतर उपचार पद्धतींचा विचार करावा लागतो.

### गुडघ्याचे इंजेक्शन कधी काम करू शकतात?

गुडघ्याच्या सांध्यातील वंगण कमी होते, तेव्हा हायलुरोनिक ॲसिड इंजेक्शन दिले जातात. हे इंजेक्शन हाडांमधील घर्षण कमी करते आणि वेदना आणि कडकपणापासून आराम देते. तथापि, इंजेक्शन फक्त कूर्च्या पूर्णपणे झिजलेल्या नाहीत अशा रुग्णांसाठी योग्य आहेत. एका इंजेक्शनचा परिणाम ४ ते ६ महिने टिकतो. त्यानंतर, दुसरे इंजेक्शन दिले जाऊ शकते. कूर्च्या जीर्ण झाल्या नसतील तर इंजेक्शन आणि निरोगी जीवनशैलीच्या मदतीने शस्त्रक्रिया टाळता येते. म्हणून, प्रथम कूर्च्या तपासा.

### कूर्च्या बदलणे फायदेशीर आहे का?

संपूर्ण कूर्च्या बदलणे शक्य नाही. दुरुस्ती किंवा कलम करणे आवश्यक आहे. तथापि, ते ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये प्रभावी नाही. ही उपचारपद्धती फक्त तरुण रुग्णांमध्ये आणि मर्यादित नुकसान असलेल्या रुग्णांमध्ये प्रभावी आहे. गुडघ्याच्या एका मोठ्या भागाला दुखापत झाली असेल, तर कार्टिलेज उपचार अप्रभावी ठरतात. म्हणूनच, लोकांना हे समजून घेणे महत्वाचे आहे, की कार्टिलेज रिप्लेसमेंट हे गुडघेदुखीने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी नेहमीच शक्य नसते.

### गुडघा रिप्लेसमेंटची आवश्यकता कधी असते?

एखादा रुग्ण औषधे काम करत नसल्याची किंवा इंजेक्शन्स आराम देत नसल्याची तक्रार करतो तेव्हा डॉक्टर गुडघा रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेची शिफारस करतात. कार्टिलेजची स्थितीदेखील तपासली जाते. ती पूर्णपणे जीर्ण झाली असेल, तर शस्त्रक्रिया आवश्यक आहे. गुडघा रिप्लेसमेंट सुरक्षित आहे. ते अनेक वर्षे टिकते आणि शस्त्रक्रियादेखील कमी वेळात केली जाते. शस्त्रक्रियेच्या त्याच दिवशी रुग्णाला रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जातो.



# दूषित पाण्यामुळे गंभीर आजार

व्याधी विकार

भारतात दरवर्षी पाणी संकट लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम करते. शहरे आणि गावांमधील अनेक लोक स्वच्छ पाणी पिऊ शकत नाहीत आणि त्यांना दूषित पाणी पिण्यास भाग पाडले जाते. हे दूषित पाणी अनेक आजारांचे मुख्य कारण आहे. दूषित पाणी पिण्यामुळे पोट, यकृत, मूत्रपिंड आणि त्वचेचे आजार होतात. प्रसंगी ते मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकते.

भारतात अनेक ठिकाणी लोकांना अजूनही स्वच्छ पाणी मिळत नाही. ही केवळ गावांमधलीच समस्या आहे, असे नाही. शहरे आणि महानगरांमध्येही दूषित पाण्यामुळे लोक आजारी पडत आहेत. घाणेरडे पाणी तुम्हाला फक्त अस्वस्थ करत नाही, तर त्यामुळे गंभीर आजारदेखील होऊ शकतात. त्यात असलेले बॅक्टेरिया, विषाणू आणि विषारी पदार्थ आपल्या शरीरात प्रवेश करतात आणि विविध समस्या निर्माण करतात.

* पोटाच्या समस्याः उलट्या, अतिसार, पोटदुखी, कॉलरा आणि टायफॉइड सारखे गंभीर आजार.
* यकृताचे आजारः हिपॅटायटीस ए आणि ई (कावीळ) सारख्या समस्या.
* मूत्रपिंडाच्या समस्याः घाणेरड्या पाण्यात असलेले आर्सेनिक, शिसे आणि कॅडमियम सारखे जड धातू हळूहळू मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात.
* त्वचेच्या समस्याः पुरळ, ॲलर्जी, सोरायसिस आणि एक्झिमा सारख्या समस्या.
* कर्करोग आणि इतर गंभीर आजारः दूषित पाण्यात असलेले कर्करोगजन्य घटक आणि विषारी पदार्थ दीर्घकालीन कर्करोगासारखे घातक आजार निर्माण करू शकतात.
* न्यूरोलॉजिकल समस्याः स्मरणशक्ती कमी होणे, मूड स्विंग आणि इतर मानसिक समस्यादेखील उद्भवू शकतात.

### घाणेरडे पाणी पिण्यामुळे देशात दरवर्षी किती लोक आजारी पडतात?

भारतात घाणेरड्या पाण्याची समस्या मोठी आहे. जुलै २०२२ च्या अभ्यासानुसार, भारतातील अंदाजे १९५,००० वस्त्यांमधील लोक दूषित पाणी पित आहेत. यामुळे केवळ सामान्य आजारच पसरत नाहीत, तर २०१९ मध्ये अंदाजे २.३ दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला. 'कम्पोझिट वॉटर मॅनेजमेंट इंडेक्स' (सीडबल्यूएमआय) अहवालानुसार भारतात दरवर्षी अंदाजे दोन लाख लोक दूषित पाणी पिण्यामुळे मरतात. या समस्येवर त्वरित उपाय केला नाही तर २०३० पर्यंत अंदाजे सहा लाख लोकांना पाण्याची टंचाई आणि दूषित पाण्याचा सामना करावा लागू शकतो.



### गलिच्छ पाणी सर्वात जास्त कुठे आहे?

शहरी झोपडपट्ट्या आणि गर्दीच्या भागात घाणेरडे पाणी सर्वाधिक प्रमाणात आढळते. लहान क्षेत्रे, वसाहती आणि अपार्टमेंटमध्ये घाणेरडे पाणी पुरवठ्यामुळे दरमहा शेकडो लोक रुग्णालयात जातात.

### तज्ज्ञांचा इशारा

दूषित पाणी पिण्यामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावरही परिणाम होतो. वेळेवर उपचार न मिळाल्यास, मूत्रपिंड आणि यकृतामध्ये गंभीर संसर्ग पसरू शकतात.

### घरगुती खबरदारी आणि उपचार

*पिण्याचे पाणीः नेहमी उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणी प्या.
* इलेक्ट्रोलाइट्सः डिहायड्रेशन टाळण्यासाठी लिंबू पाणी, नारळ पाणी आणि ओआरएस वापरा.
* हलके अन्नः उलट्या किंवा जुलाब झाल्यास, दलिया, दही-भात आणि केळीसारखे हलके अन्न खा.
* सावध राहाः सतत जुलाब, उलट्या, जास्त ताप, लघवी कमी होणे किंवा शरीर/ डोळे पिवळे होत असतील तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.
*स्वच्छताः ताजे आणि झाकलेले अन्न खा, हात चांगले धुवा आणि वेळेवर लसीकरण करा.

# तिळाकडे दुर्लक्ष नको

आजकाल लोक त्वचेबद्दल खूप गंभीर आहेत. अचानक शरीरावर तीळ येतो तेव्हा पहिला प्रश्न पडतो, की हा तीळ का दिसतो आणि तो कोणत्या आजाराचे लक्षण आहे का? खरं तर, तीळ हा त्वचेवर एक लहानसा डाग असला, तरी तो केवळ त्वचेचा पोत बदलत नाही, तर कधीकधी आरोग्याशी संबंधित बरीच माहितीदेखील देऊ शकतो. तीळ अचानक दिसतात, रंग बदलतात किंवा आकार वाढतो, तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. त्वचेमध्ये असलेल्या मेलॅनिन रंगद्रव्यामुळे तीळ तयार होतात. त्वचेच्या वरच्या थरातील मेलॅनोसाइट्स नावाच्या पेशी एकाच ठिकाणी जमतात आणि अधिक रंगद्रव्य तयार करू लागतात, तेव्हा तीळ तयार होतात. हे तीळ तपकिरी, काळे, हलके गुलाबी किंवा कधीकधी निळेदेखील असू शकतात. काही तीळ जन्मापासूनच असतात, तर काही बालपणात हळूहळू दिसतात. प्रौढ व्यक्तीच्या शरीरावर १० ते ४० तीळ असणे सामान्य मानले जाते. वयानुसार हे तीळ थोडे बदलू शकतात. कालांतराने अनेक तीळ अधिक स्पष्ट होतात. त्यांचा रंग फिकट होऊ शकतो किंवा ते स्वतःच नाहीसे होऊ शकतात.

### शरीरावर तीळ का तयार होतात?

शरीरावर तीळ तयार होण्यामागे अनेक कारणे असतात. कुटुंबातील एखाद्या सदस्याला अनेक तीळ असतील, तर पुढच्या पिढीलाही ही समस्या येऊ शकते. किशोरावस्था, गर्भधारणेदरम्यान किंवा हार्मोनल बदलांमध्ये नवीन तीळ दिसू शकतात. या काळात तीळांचा रंगदेखील बदलू शकतो. सूर्यप्रकाशातील अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे



कधीकधी मेलॅनिनचे उत्पादन वाढते. त्यामुळे शरीराच्या थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येणाऱ्या भागांवर तीळ अधिक दिसतात. याव्यतिरिक्त वयानुसार त्वचेतील बदलांमुळे तीळ तयार होऊ शकतात.

### तीळ धोकादायक असू शकतात का?

बहुतेक तीळ निरुपद्रवी असतात आणि त्यांना काढण्याची आवश्यकता नसते. तथापि, तीळ अचानक बदलला, आकारात जलद वाढ, रंगात बदल, असमान कडा, खाज सुटणे, वेदना किंवा दुखापत न होता रक्तस्राव होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशी लक्षणे त्वचेच्या कर्करोगाशी संबंधित असू शकतात.

# कॉर्टिसॉल वाढणे धोकादायक

आरोग्य मंथन

कामाचा वाढलेला ताण, आर्थिक चिंता, कौटुंबिक जबाबदाऱ्या, झोपेचा अभाव या सगळ्यामुळे शरीरात एक हार्मोन वाढते. त्याला कॉर्टिसॉल म्हणतात. हे हार्मोन आवश्यक असलं, तरी सतत वाढलेलं कॉर्टिसॉल हृदयासाठी मात्र घातक ठरते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

ताणाचे व्यवस्थापन करणे आणि हृदयाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. उच्च कोलेस्ट्रॉलप्रमाणेच, दीर्घकालीन ताण तुमच्या हृदयाला नुकसान पोहोचवू शकतो. देशभरात सर्वच वयोगटांतील लोकांमध्ये हृदयाच्या समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. अनेक वर्षांपासून हृदयाच्या समस्यांच्या बाबतीत उच्च कोलेस्टेरॉलला मुख्य गुन्हेगार मानले जाते. सध्या व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनातील तणाव, आर्थिक चिंता आणि वाढलेला स्क्रीन टाईममुळे तणावाचे प्रमाण वाढत आहे. या ताणामुळे कॉर्टिसॉलची पातळी वाढते. कॉर्टिसोलची पातळी वाढते तेव्हा ते हृदय आणि रक्तवाहिन्यांना नुकसान पोहोचवू शकते.

कॉर्टिसॉल हृदयाच्या आरोग्यावर कसा परिणाम करते? तणावाच्या वेळी आपले शरीर कॉर्टिसॉल सोडते. सतत ताण येत राहतो, तेव्हा अनेक समस्या सुरू होतात. कॉर्टिसॉलची उच्च पातळी रक्तदाब वाढवते. रक्तातील साखर वाढवते आणि पोटाभोवती चरबी साठण्यास प्रोत्साहन देते. कालांतराने यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे तुम्हाला हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. दीर्घकालीन ताणामुळे शरीरात सूज (इन्फ्लेमेशन) येते. ही सूज रक्तवाहिन्यांना नुकसान पोहोचवते आणि प्लाक जमा होण्यास मदत करते. त्यामुळे हृदयविकाराचा झटका तसेच पक्षाघाताचा धोका वाढतो. उच्च कॉर्टिसॉलमुळे झोपेत व्यत्यय येतो. शारीरिक हालचाल कमी होऊ शकते. खाण्याच्या चुकीच्या सवयी लागू शकतात आणि हृदयाला याचा त्रास होऊ शकतो. ताणामुळे धूम्रपान, कॅफीनचे वाढते सेवन, चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव यांसारख्या वाईट सवयीदेखील लागू शकतात. या सर्व गोष्टींमुळे हृदय विकाराचा धोका वाढतो. अनेक लोकांमध्ये कोलेस्टेरॉलची पातळी सामान्य असूनही, अनियंत्रित ताणामुळे त्यांना हृदयाच्या समस्या उद्भवू शकतात. तणावमुक्त राहणे आणि हृदयाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.



कॉर्टिसॉलची पातळी कमी करण्यासाठी आणि हृदयाचे संरक्षण करण्यासाठी या महत्त्वाच्या टिप्स फॉलो करा.

*योग, ध्यान किंवा दीर्घ श्वासोच्छ्वास यांसारख्या विश्रांती तंत्रांचा अवलंब करून तणावाचे व्यवस्थापन करा.
*दररोज किमान ८ तास शांत झोप घ्या.
*धूम्रपान आणि मद्यपान टाळा, कॅफीनचे सेवन मर्यादित करा.
*ताजी फळे, भाज्या, तृणधान्य, कडधान्ये आणि सुका मेवा व तेलबियांचा समावेश असलेला पौष्टिक आहार घ्या.
*जंक फूड, मसालेदार, तेलकट, हवाबंद डब्यातील आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन टाळा. *स्क्रीन टाईम कमी करा आणि कामातून ठराविक वेळाने विश्रांती घ्या.
*रोजनिशी लिहिणे तणाव कमी करण्यास मदत करू शकते.
* जास्त तणावामुळे चिंता, पॅनिक अटॅक किंवा नैराश्य येत असेल, तर तज्ज्ञांची मदत घ्या. *सक्रिय जीवनशैली बाळगा.

# किती काळ वापरायच्या वस्तू?

घरात बऱ्याच वस्तू साठवून ठेवलेल्या असतात. अशी बराच काळ जपलेली उशा, पांघरुणं वर्षानुवर्षं वापरणं आरोग्याला घातक ठरु शकतं. म्हणूनच नव्या वर्षात अशा जुन्या आणि आरोग्याला हानिकारक सामानाला बाहेरचा रस्ता दाखवा. * आकार बदललेल्या, रंग उडालेल्या, कापूस बाहेर आलेल्या उशा काढून टाका. उशांवर सर्वात जास्त धूळ साठत असते. त्यांच्यावर अनेक घातक जंतूंचा वास असतो. त्यामुळे साधारणतः दर दोन वर्षांनी उशा, पांघरूणं बदलायला हवी. * सजावटीच्या हेतूने सुगंधी मेणबत्त्या वापरल्या जातात. त्या जळत असताना घरात सुगंध दरवळतो. प्रसन्न वाटतं. पण उघड्यावर पडलेल्या मेणबत्त्यांवर भरपूर धूळ साठते. तसंच या धुरात घातक रसायनं असू शकतात. हा धूर श्वासावाटे शरीरात जाणं घातक ठरू शकतं. * डबाबंद किंवा प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा कालावधी संपत आल्यास टाकून द्या. ताजे आणि आरोग्यदायी पदार्थ खा. * कालावधी उलटून गेलेली औषधं घरात ठेऊ नका. त्यांचं सेवन खूप घातक ठरू शकतं. कालावधी पूर्णपणे न उलटलेल्या औषधांचा प्रभाव कमी झालेला असतो. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधं घेऊ नये. * टॉवेल, पंचे, नॅपकिन्स जास्त काळ वापरु नये. त्यात भरपूर बॅक्टेरिया असतात. नियमित धुण्यामुळेही बॅक्टेरिया कमी होत नाहीत.



त्यामुळे वापर सुरु केल्यापासून साधारण वर्षभराने ते टाकून द्यायला हवे. ओटा स्वच्छ करायचे स्पंज तसंच लाकडी आणि प्लास्टिक चॉपिंग बोर्डही काही काळाने बदलून टाका.

# साखर मेंदूवरही करते परिणाम

व्याधी विचार

मधुमेहाच्या बाबतीत साखरेची अनेकदा चर्चा केली जाते; परंतु सत्य त्यापेक्षा खूप खोल आहे. जास्त साखरेचा केवळ रक्तातील साखरेवरच परिणाम होत नाही, तर हळूहळू हृदय, यकृत, मेंदू आणि मानसिक आरोग्याचे नुकसान होते. त्याची सर्वात मोठी समस्या अशी आहे, की त्याचे परिणाम लगेच दिसून येत नाहीत, तर कालांतराने शांतपणे वाढतात.



साखर ही मधुमेहाचे एकमेव कारण नाही; परंतु ती एक प्रमुख जोखीम घटक आहे. साखरेची पेये आणि प्रक्रिया केलेले अन्न रक्तातील साखर आणि इन्सुलिन प्रतिरोधकता वेगाने वाढवतात. दीर्घकाळ अनियंत्रित ठेवले तर ते डोळे, मूत्रपिंड, नसा आणि हृदयाला नुकसान पोहोचवू शकते. साखर थेट कर्करोगास कारणीभूत ठरत नाही; परंतु जास्त साखरेचा आहार शरीरात लठ्ठपणा आणि जळजळ वाढवतो. हे दोन्ही घटक कर्करोगाचा धोका वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. संशोधनात असे दिसून आले, आहे की जे जास्त साखरेचे सेवन करतात, त्यांना कर्करोगाचा धोका लक्षणीयरीत्या जास्त असतो.

साखरेचे जास्त सेवन केल्याने वाईट कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्स वाढतात, तर चांगले कोलेस्टेरॉल कमी होते. यामुळे धमन्यांमध्ये चरबी जमा होते आणि हृदयरोगाचा धोका वाढतो. यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक होऊ शकतो. साखरेचा काही भाग यकृतामध्ये चरबीमध्ये रूपांतरित होतो. साखरेचे सेवन जास्त असेल तर यकृतामध्ये चरबी जमा होऊ लागते. त्याला फॅटी लिव्हर म्हणतात. वेळेवर लक्ष दिले नाही तर यामुळे जळजळ आणि यकृताचे नुकसान होऊ शकते. साखरयुक्त पदार्थ कॅलरीजने समृद्ध असतात; परंतु जास्त काळ पोट भरत नाहीत. यामुळे वारंवार भूक लागते आणि जास्त खाणे होते. हळूहळू वजन वाढते. त्यामुळे चयापचय आरोग्य बिघडते. जास्त साखरेचा मेंदूवरही परिणाम होतो. रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढल्याने मूड स्विंग, चिडचिडेपणा आणि नैराश्य येऊ शकते. अभ्यासात असे आढळून आले आहे, की जे लोक जास्त साखरेचे सेवन करतात, त्यांना नैराश्याचा धोका जास्त असतो. जास्त साखरेचे सेवन मेंदूमध्ये जळजळ आणि इन्सुलिन प्रतिरोध वाढवू शकते. याचा स्मरणशक्ती आणि शिकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. दीर्घकालीन, या स्थितीमुळे विस्मरणासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

जास्त साखरेमुळे रक्तातील साखर आणि रक्तदाब दोन्ही वाढतात. त्यामुळे मूत्रपिंडांवर अतिरिक्त ताण येतो. कालांतराने, मूत्रपिंडाचे कार्य कमकुवत होते. मधुमेह आणि उच्च रक्तदाब असलेल्या लोकांमध्ये हा धोका विशेषतः जास्त असतो.

## बॅक्टेरिया ठरू शकतो वरदान!



प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या विषाणूंचा बिमोड हे आरोग्यक्षेत्रापुढचं मोठं आव्हान आहे. त्यांना रोखण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांमध्ये प्रकाशाचा एक किरण दिसला आहे. उत्तर आयर्लंडच्या भूमीत आढळलेले बॅक्टेरिया अशा विषाणूंचा सामना करू शकतात, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इथली माती खूपच गुणकारी असल्याचं बोललं जातं. प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या चार प्रकारच्या विषाणूंविरोधात हा बॅक्टेरिया प्रभावी ठरला आहे. त्यामुळे येत्या काळात अशा घातक विषाणूंना थोपवून धरता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## रात्री दात का घासावे?



दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला जातो. पण बरेच जण रात्री झोपण्याआधी दात घासत नाहीत. अर्थातच ही मोठी चूक आहे. रात्री दात घासणं अत्यंत गरजेचं आहे. दात न घासता झोपल्याने त्यावर प्लाकचा थर साचतो आणि दात कठोर बनतात. या थरामुळे तोंडाला दुर्गंधी येणं, हिरड्यांमधून रक्त येणं, जंतूसंसर्ग, हिरड्यांची सूज यांसारख्या समस्या निर्माण होतात. तोंडात सातत्याने आम्ल तयार होत असतं. रात्री दात घासल्याने आम्लाच्या निर्मितीला प्रतिबंध घातला जातो. बॅक्टेरियांची वाढ थांबते. तोंडात अन्नकण रहात नसल्यामुळे कुजण्याचा धोका रहात नाही आणि दात चांगले राहतात.

## डोळे कोणत्या रंगाचे?



गडद रंगाचे डोळे असणाऱ्यांना हिवाळ्यातले नेत्रविकार जडण्याची शक्यता अधिक असते. निळ्या किंवा फिकट रंगाचे डोळे असणाऱ्यांमध्ये नेत्रविकारांचं प्रमाण कमी असल्याचं आढळून आलं आहे. हे अनुमान काढण्यासाठी १७५ विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला. फिकट डोळ्यांमध्ये प्रकाश कमी प्रमाणात शोषला जात असल्याचं तज्ज्ञ सांगतात.

## केस गळत आहेत?



प्रदूषण, ताण, विविध रसायनांचा वापर यामुळेही केस गळण्याची समस्या निर्माण होते. पोषक घटकांचा अभावही केसगळतीला कारणीभूत ठरतो. हे थांबवण्यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असावा. दूध, दही, अंडी, मटार, सुका मेवा यांचं सेवन करता येईल. अंड्यातला पिवळा भाग, रताळी, ॲव्होकॅडो, यीस्ट, दुग्धजन्य पदार्थांमधून बियोटिन हा घटक मिळतो जो उपकारक ठरतो. यासोबतच मेडिटेशन आणि योगाचाही चांगला परिणाम दिसून येतो.

# संतुलित जीवनशैलीसाठी

लाईफस्टाईल



पोषक आहार, पुरेसा व्यायाम आणि सोबतीला समाधान अशी आदर्श जीवनशैली राखणं ही तारेवरची कसरत ठरते. एकतर आपण डाएटचा अतिरेक करतो किंवा त्याकडे पूर्ण दुर्लक्ष तरी करतो. पण हे दोन्ही प्रकार टाळून सुवर्णमध्य गाठणं गरजेचं असतं. तन आणि मन दोघांनाही लाभदायी ठरणारी जीवनशैली कशी जपायची? जाणून घेऊ या.

* भूक लागलेली असताना खाणं आणि उगाचच भावनेच्या भरात चरत राहणं यात फरक करता यायला हवा. अन्न ग्रहण करतेवेळी संपूर्ण लक्ष खाण्यावर केंद्रित करा. यावेळी स्मार्टफोन वापरू नका. टीव्ही बघू नका.
* आपण नियमित व्यायामाचं महत्त्व जाणतो. शारीरिक कसरतीमुळे शरीरासोबतच मेंदूही निरोगी राहतो. त्यामुळे व्यायामाची निश्चित वेळ ठरवा आणि मुख्य म्हणजे ती पाळा.
* वजन कमी करण्याच्या नादात जेवण टाळू नका. यामुळे शरीराला पोषक घटक मिळत नाहीत. उगीच उपासमार होते. इतकंच नाही तर यामुळे अतिखाणं होतं.
* जेवताना शीतपेय किंवा फळांच्या रसाऐवजी पाणी प्या.

# रात्रीच्या वेळी प्रवाशाला कोयत्याचा धाक दाखवून लुटणारी टोळी पकडली



नगर – नगर – पाथर्डी रोडवर गर्भगिरी फाटा, बारदरी (ता.नगर) येथे रात्रीच्या वेळी लघुशंकेसाठी रस्त्याच्या कडेला थांबलेल्या प्रवाशाला कोयत्याचा धाक दाखवून दागिने व रोकड लुटणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्याकडून २ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

शुभम शहादेव बडे (वय २६, रा. वाणीनगर, पाईपलाईन रोड, सावेडी), सोहेल पापाभाई सय्यद (वय २९ रा. देवटाकळी, ता. शेवगाव), अशपाक नासिर पठाण (वय २८ रा. यशवंतनगर, भिंगार) तसेच त्यांच्या २ मैत्रिणी वैष्णवी राजेंद्र उनवने (वय २४, रा. सारंग अपार्टमेंट, भगवान बाब चौक, मुळे इस्टेट, अहिल्यानगर), रुपाली गजानन बनकर (वय– २४, रा. डेअरी चौक, एम.आय.डी. सी., अहिल्यानगर) अशी या आरोपींची नावे आहेत.

सुलभ अंबादास नरसाळे (वय २९, रा. कल्याण रोड, नालेगाव, अहिल्यानगर) हे २४ जानेवारी रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास बारदरी रोडवरील गर्भगिरी फाटा येथे लघुशंका करण्यासाठी रस्त्याचे कडेला गाडी थांबविली असता मोटरसायकलावरुन आलेल्या तीन इसमांनी गळ्याला कोयता लावुन बळजबरीने सोने चांदीचे दागिणे, रोख रक्कम काढुन घेवुन गेले. सदर घटनेबाबत नगर तालुका पोलीस स्टेशन येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल झालेला होता.

पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. हरिष भोये, पोलीस अंमलदार दिपक घाटकर, भिमराज खर्से, राहुल डोके, प्रशांत राठोड, अमृत आढाव, योगेश कर्डीले, सोनल भागवत, चालक उत्तरेश्वर मोराळे यांचे पथक करत होते. या पथकाला ३० जानेवारी रोजी तपास सुरु असताना माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा शुभम शहादेव बडे याने त्याच्या साथीदारासह केला असुन तो त्याचे साथीदारासह तपोवन रोड येथे एका गाडीवर बसलेला आहे. ही माहिती मिळताच पथकाने तेथे जावून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली देत चोरीचे दागिने मैत्रिणी वैष्णवी उनवने व रुपाली बनकर यांचेमार्फतीने विक्री केल्याचे सांगितले आहे. त्यानंतर सदर दोन्ही महिलांचा शोध घेत त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी दागिने केडगाव येथील सराफाला विकल्याचे सांगितले. पोलिसांनी त्या सराफाकडून सदर दागिने हस्तगत केले आहेत.

# दोन लग्ने लपवून तिसरा विवाह करणाऱ्याला दोन वर्षे सक्तमजुरी

नगर – दोन विवाह झालेले असतानाही घटस्फोटाचा खोटा पुरावा दाखवून तिसरे लग्न करणाऱ्याला मुख्य न्यायदंडाधिकारी एल. एस. पाढेण यांनी दोन वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. जयदीप कौशिक मोरे (वय ३४, रा. अभियंता कॉलनी, अहिल्यानगर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

या खटल्याची पार्श्वभूमी अशी की, आरोपीने फिर्यादी महिलेची फसवणूक करून तिच्याशी विवाह केला होता. आरोपीचे पूर्वी दोन विवाह झाले होते, तरीही त्याने दुसऱ्या पत्नीसोबत घटस्फोट झाल्याचा बनावट पुरावा सादर केला. तोफखाना पोलीस ठाण्यात याप्रकरणी भा.दं.वि. कलम ४९४, ४९८ अ, ५०४ आणि ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर खटला मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात चालला.

अभियोग पक्षाच्या वतीने एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी जयदीप मोरे याला कलम ४९४ (दुसरा विवाह करणे) अंतर्गत दोषी ठरवले. दंडाची १० हजार रुपये रक्कम फिर्यादी महिलेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, पुराव्याअभावी इतर पाच आरोपींची छळवणूक आणि इतर कलमांमधून निर्दोष मुक्तता करण्यात आली. या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने कनिष्ठ वकील अमित यादव आणि सीमा शेख यांनी काम पाहिले. त्यांना तपास अधिकारी पोलीस हवालदार एस. डी. मोरे आणि पैरवी अधिकारी सहायक फौजदार नितीन गायकवाड यांनी सहकार्य केले. अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात या निकालाची मोठी चर्चा सुरू होती.

# पारधी विकास आराखड्यातून निधी वाढवून द्यावा अन्यथा आदिवासी युवा क्रांती संघटनेतर्फे आंदोलन



पारधी समाजाच्या मागण्यांबाबत आदिवासी पारधी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

नगर – आदिवासी विकास प्रकल्प, राजूर (ता. अकोले) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पारधी विकास आराखडा योजनेतील शेळी गट योजनेत सध्या केवळ ६८ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली असून, ही संख्या वाढवून किमान २०० ते २५० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी ठाम मागणी आदिवासी पारधी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक पारधी कुटुंबांपर्यंत पोहोचल्यास समाजातील तळागाळातील घटक वंचित राहणार नाहीत. तसेच या योजनेमुळे आदिवासी पारधी समाजातील कुटुंबांना रोजगाराची संधी मिळून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीसाठी आदिवासी युवा क्रांती संघटनेचे अध्यक्ष अजित भोसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अक्षय भोसले, विलास काळे, आसाराम काळे, सुरेश काळे, राहुल भोसले, करण भोसले, रामसिंग भोसले, सचिन काळे, नवनाथ भोसले यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, पारधी विकास आराखडा योजनेत तातडीने निधी वाढवून लाभार्थ्यांची संख्या वाढविण्यात यावी, अन्यथा आदिवासी युवा क्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस नगरसेवकांच्यावतीने अजितदादांना श्रद्धांजली

## अहिल्यानगर शहराच्या इतिहासातील मोठा निधी अजित दादांच्या माध्यमातून मिळाला : आ. काशिनाथ दाते



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नगराचे विकास काम ातून बदललेले रूप म्हणजेच स्वर्गीय अजित दादा होय, असे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

या वेळी उपस्थित होते आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, गटनेते प्रकाश भागानगरे, भगवान फुलसौंदर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, सुरेश बनसोडे, अजिंक्य बोरकर, महेश तवले, डॉ. सागर बोरुडे, सुनील काळे, विपुल शेटीया, विजय गव्हाळे, मयूर बांगरे, केशव नागरगोजे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, सुमित लोंढे, जितू गंभीर, गोरख पडोळे, संग्राम रासकर, जय भोसले, किसन भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्र हतबल झाला असून सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले आहेत. अजितदादा आणि अहिल्यानगर शहर यांचे अतूट नाते आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून घडले होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, शहराच्या इतिहासात एवढा मोठा निधी कधीही मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजितदादा पवार यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. त्यांनी नेहमीच दर्जेदार विकासकामांकडे लक्ष दिले. वयाच्या ७०व्या वर्षी दादांनी मला न्याय देत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पारनेर मतदारसंघाचा आमदार केले. अहिल्यानगर शहर हे अजित दादा यांच्या विचाराचे आहे.

चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, अजित दादांनी सर्वात जास्त आमदार संग्राम जगताप यांना न्याय आणि प्रेम दिले, म्हणूनच विकासाची कामे मार्गी लागली. दादांनी आपल्यावर टाकलेली जबाबदारी आपण सर्वांनी पार पाडायची आहे.

गणेश भोसले म्हणाले, माझ्या तीस–पस्तीस वर्षांच्या राजकारणाच्या कार्यकाळात कधीही एवढा मोठा निधी मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजितदादांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. माझ्या प्रभागामध्ये नगरकरांच्या हक्काचे हॉस्पिटल व क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाले. हे काम अजितदादा पवार यांच्या माध्यमातून पूर्ण झाले. त्यांच्या हस्तेच या वस्तूंचे उद्घाटन करायचे होते, मात्र ते स्वप्नच राहिले. कार्यकर्त्यांची दखल घेणारा नेता म्हणजे अजित दादा होय.

संपत बारस्कर म्हणाले, अजितदादा पवार यांच्या निधनामुळे सर्वपक्षीय शोकसभा २ फेब्रुवारी रोजी सहकार सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. अजितदादांनी आपल्या परखड वाणीतून जनतेची मने जिंकली. स्पष्टवक्तेपणामुळे ते संपूर्ण देशाला परिचित होते. जातिपातीच्या पलीकडचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी राजकीय वाटचालीत संघर्ष केला. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजितदादांची स्नेहाचे संबंध आले आणि नगरकरांच्या विकासाची वाट मोकळी झाली. निवडणुकीच्या काळात आपण जनतेसमोर मते मागण्यासाठी जात होतो, तेव्हा मतदारांना केलेल्या विकासकामांची आठवण करून दिली जात होती, ही अभिमानाची गोष्ट होती.

कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी श्रद्धांजलीपर आपले मनोगत व्यक्त केले.

# 'राष्ट्रवादी'चे अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नगरमध्ये २ फेब्रुवारीला 'सर्वपक्षीय शोकसभा'

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक व सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यासाठी सर्व पक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. सर्वपक्षीय शोकसभा २ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता सहकार सभागृह, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

अजितदादा पवार यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत जनतेच्या प्रश्नांसाठी कठोर भूमिका घेतली. प्रशासनावर मजबूत पकड, निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे त्यांनी राज्याच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या जाण्याने एक अनुभवी, लोकनेतृत्व करणारा नेता हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

ही सर्वपक्षीय शोकसभा जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे अध्यक्षतेखाली व जिल्ह्यातील आजी – माजी खासदार, आजी माजी – आमदार, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, सर्व सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, त्यांचे समवेत जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक आदीसह सर्व क्षेत्रातील तसेच नागरिकांनी उपस्थित राहून स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन कपिल पवार उत्तर जिल्हाध्यक्ष, अशोक सावंत दक्षिण जिल्हाध्यक्ष, संजय कोळगे, कार्याध्यक्ष व संपत बारस्कर शहराध्यक्ष यांनी केले आहे.

# श्री संत रविदास महाराज जयंतीनिमित्त १ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचे आयोजन

नगर – श्री संत शिरोमणी सद्गुरू रविदास महाराज जयंती उत्सवानिमित्त संत रविदास महाराज मित्र मंडळातर्फे तोफखाना परिसरातील मोची गल्लीतील शितळादेवी मंदिर येथे १ फेब्रुवारी रोजी दु.१ ते ४ यावेळेत महाप्रसाद (भंडारा) चे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# कॉलेज तरुणीचा पाठलाग करणाऱ्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – कॉलेजला जाताना आणि घरी येताना एका तरुणीचा सतत चोरून पाठलाग करून तिला त्रास देणाऱ्या एका तरुणाविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सावेडी उपनगरातील निर्मलनगर परिसरात घडली आहे. पीडित तरुणी ही न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. त्याच कॉलेजमध्ये शिकणारा आरोपी सागर संजय टोकेकर (रा. केडगाव देवी, शिवाजीनगर) हा गेल्या काही दिवसांपासून या तरुणीवर पाळत ठेवत होता. पीडितेने त्याला अनेकदा बजावून देखील त्याने तिचा पाठलाग करणे थांबवले नाही. डिसेंबर महिन्यापासून आरोपीने तरुणीच्या घरासमोर मोटारसायकलवरून येऊन तिला हातवारे करणे आणि तिचा पाठलाग करणे सुरूच ठेवले होते.

२४ जानेवारीला दुपारी आरोपी पुन्हा तरुणीच्या घरासमोर आला आणि त्याने तिला आवाज देऊन त्रास देण्याचा प्रयत्न केला. या सततच्या त्रासामुळे आणि छेडछाडीमुळे पीडित तरुणीने अखेर धाडस दाखवून तोफखाना पोलीस स्टेशन गाठले आणि फिर्याद दिली. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७८ (२) नुसार आरोपी सागर टोकेकर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस अंमलदार गोसावी करत आहेत.

# संत रविदास महाराज
## सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ

भारतीय समाजाच्या इतिहासात संतपरंपरेला केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ म्हणून विशेष स्थान आहे. मध्ययुगीन भारतातील सामाजिक विषमता, जातिभेद, धार्मिक कर्मकांड आणि मानवी प्रतिष्ठेचे होत असलेले अवमूल्यन या पार्श्वभूमीवर संतांनी मानवतावादी विचार मांडले. याच संतपरंपरेतील एक तेजस्वी आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा संत म्हणजे संत रविदास महाराज होय. १ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एका संताचे स्मरण करण्यापुरती मर्यादित न राहता, भारतीय समाजाच्या समतेच्या संघर्षाचा आणि माणुसकीच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची संधी देते.

संत रविदास महाराजांचा काळ हा सामाजिक अन्यायाने ग्रासलेला होता. जातीनुसार माणसाचे मूल्य ठरवले जात होते. जन्माच्या आधारे शुद्ध–अशुद्ध, उच्च–नीच असे भेद केले जात होते. समाजातील मोठा वर्ग शिक्षण, धर्म, संस्कृती आणि सन्मानापासून वंचित होता. अशा काळात संत रविदास महाराजांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, हा मूलभूत विचार निर्भीडपणे मांडला. त्यांच्या विचारांची धार समाजातील अन्यायकारक रचनांवर थेट प्रहार करणारी होती. संत रविदास महाराजांचा जन्म वंचित समाजघटकात झाला असला, तरी त्यांनी आपल्या जन्माला कधीही मर्यादा मानली नाही. उलट, त्यांनी आपल्या अनुभवांमधून समाजातील विषमतेची तीव्र जाणीव करून घेतली आणि त्याविरुद्ध वैचारिक संघर्ष उभारला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या कर्माने आणि आचरणाने ठरते. हा विचार त्या काळातील सामाजिक व्यवस्थेसाठी क्रांतिकारक होता. अस्पृश्यता ही त्या काळातील समाजाची सर्वांत विदारक समस्या होती. काही माणसांना केवळ जन्मामुळे अपवित्र ठरवले जात होते. त्यांना सामाजिक जीवनापासून दूर ठेवले जात होते. संत रविदास महाराजांनी या अमानवी व्यवस्थेचा तीव्र निषेध केला. ईश्वर जर सर्वांमध्ये आहे, तर एखादा माणूस अपवित्र कसा ठरू शकतो, हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न आजही तितकाच मूलभूत आहे. त्यांच्या विचारांनी अस्पृश्यतेच्या मुळावरच घाव घातला.

संत रविदास महाराजांचा संघर्ष केवळ शब्दांपुरता नव्हता. त्यांच्या दैनंदिन आचरणातून समतेचा विचार प्रकट होत होता. त्यांनी सर्व जाती–धर्मांच्या लोकांशी समानतेने वागणूक दिली. त्यांच्या सहवासात कोणताही भेदभाव नव्हता. त्यामुळे त्यांच्या आश्रमात आणि त्यांच्या सभोवती समतेचे एक वेगळे सामाजिक विश्व उभे राहिले. समाजातील वंचित घटकांना त्यांच्या सहवासातून आत्मसन्मानाची जाणीव मिळाली. धर्मसत्तेवर केलेली टीका हे संत रविदास महाराजांच्या सामाजिक कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा असावा, तो माणसामाणसांत भिंती उभ्या करणारा नसावा, असा त्यांचा आग्रह होता. कर्मकांड, बाह्य विधी आणि दांभिक धार्मिक आडंबर यांवर त्यांनी कठोर प्रहार केला. त्यांच्या मते खरा धर्म म्हणजे करुणा, परोपकार आणि सामाजिक न्याय तत्त्व आत्मसात सारणे होय. श्रमप्रतिष्ठेचा विचार संत रविदास महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता. शारीरिक श्रम करणाऱ्या वर्गाला समाजात तुच्छ लेखले जात होते. संत रविदास महाराजांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. समाज उभा राहतो तो श्रमिकांच्या कष्टावर, हे त्यांनी ठामपणे मांडले. श्रम करणारा माणूस कमी दर्जाचा नसून तो समाजाचा आधारस्तंभ आहे, हा संदेश त्यांनी आपल्या जीवनातून दिला.

संत रविदास महाराजांची वाणी आणि साहित्य हे त्यांच्या सामाजिक कार्याचे प्रभावी साधन होते. त्यांच्या पदांमध्ये आणि उक्तींमध्ये समाजातील अन्यायावर थेट भाष्य आढळते. त्यांची भाषा सरळ, अनुभवसिद्ध आणि सामान्य माणसाच्या मनाला भिडणारी होती. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार व्यापक स्तरावर झाला. भक्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षाची प्रक्रिया नसून ती सामाजिक आचरणाशी जोडलेली आहे, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे. जो माणूस दुसऱ्याशी प्रेमाने आणि न्यायाने वागतो, तोच खरा भक्त आहे, असे त्यांनी सांगितले. जात, धर्म, लिंग किंवा भाषा यांवर आधारित कोणताही भेद त्यांनी नाकारला. माणसाचे मोल त्याच्या आचरणावर ठरते, हा विचार सामाजिक समतेचा पाया आहे. स्त्री–पुरुष समानतेविषयीचा दृष्टिकोनही त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतो. त्या काळातील मर्यादा असूनही त्यांनी स्त्रीला दुय्यम स्थान दिले नाही. मानवी मूल्यांच्या पातळीवर स्त्री–पुरुष समान आहेत, हा त्यांचा दृष्टिकोन सामाजिकदृष्ट्या प्रगत होता.


संत रविदास महाराजांनी कल्पिलेला समाज हा समतेवर, न्यायावर आणि बंधुत्वावर आधारित होता. अशा समाजात कोणालाही जन्मामुळे कमी लेखले जात नाही. ही संकल्पना केवळ स्वप्नवत नव्हती, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारी होती. त्यामुळे त्यांच्या विचारांनी समाजातील वंचित घटकांना परिवर्तनाची आशा दिली. आधुनिक भारतात संत रविदास महाराजांचे विचार अधिकच सुसंगत ठरतात. आजही जातीय विषमता, सामाजिक बहिष्कार आणि आर्थिक असमानता विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांचा समतेचा संदेश मार्गदर्शक ठरतो. भारतीय संविधानाने दिलेली समानता, सामाजिक न्याय आणि बंधुतेची मूल्ये संत रविदास महाराजांच्या विचारांशी सुसंगत आहेत. संविधानिक मूल्यांची प्रभावी अंमलबजावणी तेव्हाच शक्य होते, जेव्हा समाजमन त्यासाठी तयार असते. संत रविदास महाराजांचे विचार समाजमन घडवण्याचे कार्य करतात. त्यामुळे ते केवळ धार्मिक संत न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरतात. आज संत रविदास महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे आचरणात रूपांतर करणे, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल. सामाजिक समतेसाठी झटणे, श्रमाचा सन्मान करणे आणि माणुसकी जपणे, हाच त्यांच्या संदेशाचा गाभा आहे. ०१ फेब्रुवारी रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण करणे, हेच या दिनाचे खरे औचित्य आहे.

समाजाच्या इतिहासात असे काही विचारवंत जन्माला येतात, जे केवळ आपल्या काळाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर येणाऱ्या पिढ्यांसाठीही मूल्यदिशा ठरवतात. संत रविदास महाराज हे त्याच प्रकारचे द्रष्टे संत होते. त्यांनी मांडलेला समतेचा विचार हा तत्कालीन समाजव्यवस्थेवर टीका करणारा तर होताच, पण तो भविष्यातील समाजरचनेसाठीही मार्गदर्शक ठरला. त्यांच्या विचारांचा गाभा हा माणसाच्या प्रतिष्ठेभोवती फिरतो. कोणताही माणूस जन्मामुळे कमी किंवा अधिक ठरू शकत नाही, ही भूमिका त्यांनी अत्यंत ठामपणे मांडली.

संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक क्षेत्रांतही त्यांच्या विचारांनी खोलवर परिणाम घडवून आणला. समाजातील वंचित घटकांना त्यांनी आत्मभान दिले. अन्याय सहन करणे ही नियती नसून त्याविरुद्ध विचारपूर्वक उभे राहणे हेच खरे माणूसपण आहे, हा संदेश त्यांच्या संपूर्ण जीवनातून प्रकट होतो. त्यामुळे त्यांच्या विचारांची धार ही परिवर्तनवादी होती. भक्ती चळवळीतील इतर संतांप्रमाणेच संत रविदास महाराजांनीही भक्तीला सामाजिक आशय दिला. भक्ती म्हणजे केवळ ईश्वराचे नामस्मरण नव्हे, तर समाजातील अन्याय ओळखून त्याविरुद्ध नैतिक भूमिका घेणे, असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे त्यांच्या भक्तीत विद्रोहाची सौम्य, पण प्रभावी छटा आढळते. ही भक्ती समाजाला अंतर्मुख करते आणि आत्मपरीक्षणास भाग पाडते.

आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगातही संत रविदास महाराजांचे विचार तितकेच लागू पडतात. आर्थिक प्रगती झाली असली, तरी सामाजिक विषमता पूर्णपणे नष्ट झालेली नाही. जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक स्थिती यांवर आधारित भेद अजूनही दिसून येतात. अशा वेळी संत रविदास महाराजांचा मानवतावादी दृष्टिकोन समाजाला अधिक समतावादी आणि संवेदनशील बनवू शकतो. शिक्षणाच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यांच्या विचारांमधील समता, श्रमप्रतिष्ठा आणि बंधुता ही मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचली, तर समाज अधिक न्याय्य होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक गरज नसून सामाजिक गरज आहे.

संत रविदास महाराजांचा वारसा हा केवळ ग्रंथांमध्ये किंवा जयंतीपुरता मर्यादित राहू नये. तो प्रत्यक्ष आचरणात उतरला पाहिजे. सामाजिक समतेसाठी केलेला प्रत्येक प्रयत्न, श्रमाचा सन्मान करणारी प्रत्येक कृती आणि माणुसकी जपणारे प्रत्येक पाऊल हेच त्यांच्या विचारांचे खरे स्मरण ठरेल. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याची जिद्द म्हणजेच संत रविदास महाराजांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचा मार्ग आहे.



अशा प्रकारे संत रविदास महाराजांचे सामाजिक कार्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी दृष्टिकोन हे भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या प्रवासातील महत्त्वाचे अधिष्ठान ठरते. १ फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे स्मरण करणे ही केवळ औपचारिक बाब नसून ती सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी घटना आहे. समता, श्रम आणि माणुसकी यांचा संदेश देणारे संत रविदास महाराज आजही आपल्या समाजाला अंतर्मुख होण्यास आणि अधिक मानवी बनण्यास प्रवृत्त करतात.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

संत गुरु रविदास महाराजांच्या जयंती निमित्ताने...

# महाराष्ट्राच्या राजकारणात चर्मकार समाजाचे स्थान




महाराष्ट्राच्या राजकारणात चर्मकार समाजाचे अस्तित्व अत्यंत महत्त्वपूर्ण आणि निर्णायक राहिले आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने हा समाज महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील (SC) एक मोठा आणि प्रभावशाली घटक आहे. ऐतिहासिक काळापासून ते आजपर्यंत या समाजाचा राजकीय प्रवास महाराष्ट्रात चर्मकार समाजाची लोकसंख्या विखुरलेली असली तरी अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये हा समाज 'किंगमेकर' च्या भूमिकेत असतो.

अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या विधानसभा आणि लोकसभा जागांवर चर्मकार समाजाचे मोठे प्रतिनिधित्व असते. सुशीलकुमार शिंदे, बबनराव घोलप चर्मकार समाजाचे एक महत्त्वाचे नेते मानले जातात. यांसारख्या नेत्यांनी वेगवेगळ्या काळात समाजाचे नेतृत्व केले आहे.

महाराष्ट्राच्या प्रत्येक मंत्रिमंडळात चर्मकार समाजाला स्थान देण्याचा प्रयत्न सर्वच राजकीय पक्षांकडून (शिवसेना, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी) केला जातो. सामाजिक न्याय मंत्रालय किंवा महत्त्वाची खाती या समाजातील नेत्यांकडे राहिली आहेत. ग्रामपंचायतीपासून ते महानगरपालिकांपर्यंत समाजाचा सक्रिय सहभाग आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, खान्देश आणि मराठवाड्यात समाजाचे राजकीय अस्तित्व प्रबळ आहे.

राजकीय ताकद असूनही, समाजासमोर काही गंभीर आव्हाने उभी आहेत. विखुरलेली मते समाज कोणत्याही एका ठराविक राजकीय पक्षाशी बांधील नसल्यामुळे मतदानाचे विभाजन होते. अंतर्गत स्पर्धा अनुसूचित जातींमधील इतर उपजातींशी राजकीय स्पर्धा करावी लागते, ज्यामुळे कधीकधी मुख्य सत्तेपासून समाज दूर राहतो. निवडणुका प्रचंड खर्चिक झाल्या असल्याने, सामान्य कार्यकर्त्याला निवडणुकीच्या रिंगणात उतरणे कठीण जाते. आजच्या काळात केवळ 'कार्यकर्ता' म्हणून न राहता 'नेतृत्व' निर्माण करणे काळाची गरज आहे.

सुशिक्षित तरुणांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला पाहिजे. केवळ भावनिक मुद्द्यांवर न लढता शिक्षण, उद्योग आणि आरक्षणाच्या अंमलबजावणीवर आधारित राजकारण करणे गरजेचे आहे. राजकीय मतभेद असले तरी समाजाच्या हिताच्या प्रश्नांवर सर्वपक्षीय चर्मकार नेत्यांनी एकत्र येणे आवश्यक आहे.



**– शिवाजी साळवे,**
प्रदेश कार्याध्यक्ष, राष्ट्रीय चर्मकार महासंघ,
महाराष्ट्र राज्य, जिल्हा सरचिटणीस,
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अहिल्यानगर.

